नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : १४६ | किंमत : ४ रूपये
Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक
# समर्थ गांवकरी
संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे
POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026




सोमवार, दि. २७ एप्रिल २०२६
मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

## अकोला : पारा ४६.९ अशांवर

### राज्यात गेल्या पाच वर्षांतील एप्रिलमधील सर्वाधिक तापमान

**मुंबई : (स. गांवकरी)**

अकोला येथे एप्रिल महिन्यातील मागील पाच वर्षातील, एप्रिलमधील सर्वाधिक कमाल तापमानाची नोंद रविवारी झाली. तेथे ४६.९ अंश सेल्सिअस कमाल तापमान नोंदले गेले. यापूर्वी एप्रिल महिन्यातील आतापर्यंतचे सर्वाधिक कमाल तापमान (४७.७) अकोला येथेच २०२९ मध्ये नोंदले गेले होते. दरम्यान राज्यात सध्या कोरडे हवामान असून पश्चिमी विक्षोभाचा प्रभाव हळूहळू पूर्वेकडे सरकत आहे. विदर्भात उष्णतेची लाटेसदृश्य स्थिती कायम आहे. पुढील दोन दिवस विदर्भात उष्णतेची लाटेसदृश्य स्थिती कायम राहील, असा अंदाज हवामान विभागाने वर्तविला आहे. सध्या देशासह राज्यातील नागरिकांना हवामान बदलाचा सामना करावा लागत आहे. राज्यात सध्या प्रतिचक्रवाती स्थिती असल्यामुळे अनेक जिल्ह्यातील कमाल तापमानात वाढ नोंदली जात आहे. मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आदी भागातही उन्हाचा तडाखा वाढला असून कोकण प्रदेशात उष्ण आणि दमट वातावरणामुळे नागरिकांच्या समस्यांमध्ये वाढ झाली आहे. दरम्यान, सोमवारी संपूर्ण राज्यात हवामान कोरडे राहील, अशी शक्यता हवामान विभागाने वर्तविली असून सोमवारी राज्यातील कमाल तापमानात फारसा बदल होणार नाही,



असा अंदाजही हवामान विभागाने व्यक्त केला आहे. त्यानंतर चार ते पाच दिवसांनी कमाल तापमानात २ ते ३ अंश सेल्सिअसने घट होण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली असून यामुळे नागरिकांना तीव्र उन्हापासून दिलासा मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. दरम्यान, सोमवारी राज्याच्या अंतर्गत भागात कमाल तापमान ४२ ते ४४ अंश सेल्सिअस राहील, असा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे.

विदर्भात मागील काही दिवसांपासून उष्णतेची लाटेसदृश्य स्थिती असून यामुळे तेथील बहुतांश जिल्ह्यांतील कमाल तापमान सरासरीहून ३ ते ४ अंश अधिक नोंदले जात आहे. वर्धा, अमरावती आणि अकोला आदी भागात सातत्याने पारा ४५ अशांवर पाहोचत असून रविवारी अकोला येथे ४६. ९, अमरावती ४६.८, वर्धा ४६.४, तर यवतमाळ येथे ४६ अंश सेल्सिअस इतके कमाल तापमान नोंदले गेले. तर विदर्भातील बहुतांश भागातील पारा ४२ ते ४५ अंशाच्या दरम्यान नोंदला गेला. दरम्यान, अकोला, अमरावती आणि वर्धा आदी जिल्ह्यांत उष्णतेची लाटेसदृश्य स्थिती लक्षात घेऊन या भागांना सोमवारी 'ऑरेंज अलर्ट' देण्यात आला आहे. मराठवाड्यातील कमाल तापमानातही वाढ नोंदली जात असून या प्रदेशातील सर्वाधिक तापमान छत्रपती संभाजीनगर येथे ४३.४ अंश सेल्सिअस इतके नोंदले गेले. तसेच नागपूर, चंद्रपूर, भंडारा, बुलढाणा आदी भागात सोमवारी उष्णतेची लाटेसदृश्य स्थिती राहील, अशी शक्यता हवामान विभागाने वर्तविली असून या भागांना उष्णतेचा 'यलो अलर्ट' देण्यात आला आहे.

> अमरावती येथे एप्रिल २०१९ मध्ये ४६.८ अंश सेल्सिअस कमाल तापमानाची नोंद झाली होती. त्यांनतर सात वर्षांनी एप्रिल महिन्यातील सर्वाधिक कमाल तापमानाची नोंद रविवारी झाली. येथे ४६.८ अंश सेल्सिअस कमाल नोंदले गेले . तर वर्धा येथे एप्रिल १९९६ मध्ये ४६.४ अंश सेल्सिअस कमाल तापमानाची नोंद झाली होती. येथे तीस वर्षांनी रविवारी पुन्हा एकदा ४६.४ अंश सेल्सिअस कमाल तापमानाची नोंद झाली.








# सुसंस्कृत, सोज्वळ, अभ्यासू व्यक्तिमत्व
## माजी आमदार वैभवराव पिचड

(समर्थ गांवकरी)

**अहमदनगर जिल्ह्यासह मराठवाड्याला पाणी पुरविणारा तालुका, आदिवासी दुर्गम तालुका, संगमनेरचा धाकटा भाऊ आणि सर्वात महत्त्वाचे देशभरत पिचड साहेबांचा अकोले तालुका अशी ओळख असणाऱ्या अकोल्याचे विधानसभेत प्रतिनिधित्व केलेल्या सुसंस्कृत, सोज्वळ, युवा पण अभ्यासू व वडीलधाऱ्यांचा मान ठेवणारा तर तरुणांच्या गळ्यातील ताईत असा समाजशील चेहरा असणारे अकोले तालुक्याचे नेतृत्व म्हणजे माजी आमदार वैभवराव पिचड. आज त्यांचा वाढदिवस व वाढदिवसाचे औचित्य साधून त्यांच्या व्यक्तीमत्वाचा उहापोह यानिमित्ताने।**

खरं तर मान, सन्मान, प्रतिष्ठा, प्रसिद्धी याचा कधीही हव्यास नसलेल्या या युवा नेतृत्वाने आजपर्यंत कधीच आपला वाढदिवस जल्लोषात मोठ्या दिमाखात साजरा केला नाही. ते त्यांना आवडतही नाही पण मित्र परिवार कुटुंब व कार्यकर्त्यांच्या मानसिकतेचा विचार करून फक्त शुभेच्छा स्विकारणे इतकेच स्वरुप या कार्यक्रमाचे असते. आजही कोविडच्या पार्श्वभूमीवर कोणतेही सोपस्कार होणार नाहीत, जे जनतेचे दुःख तेच माझे दुःख हा विचार आपल्या कार्यकर्त्यांना देणारे युवा नेतृत्व म्हणजे वैभवराव पिचड, २०१४ च्या विधानसभा निवडणूकीत माजी मंत्री पिचड साहेबांचे राजकीय वारसदार म्हणून त्यांनी अकोले विधानसभेची निवडणूक लढविली, ती प्रचंड मताधिक्याने जिंकली व विधानसभेत ज्या युवा आमदारांची फळी उभी टाकली होती, त्यातील संयमी, शांत पण प्रश्नांसाठी तितकेच आक्रमक व अभ्यासू आमदार म्हणून आपला ठसा उमटवून गेले. विधानसभेतील त्यांची कारकीर्द संस्मरणीय ठरली ती माजी मंत्री मधुकररावजी पिचड यांचा मुलगा म्हणून नाही तर माजी मंत्री पिचडांच्या तालमित तयार झालेल्या खऱ्या हुशार, अभ्यासू, सुसंस्कृत व आपल्या मतदार संघातील जनतेच्या प्रश्नांसाठी भांडणारे कर्तृत्ववान युवा विधानसभा सदस्य म्हणून. आपले प्रश्न मांडण्याची व ते सोडवून घेण्याची कला, प्रशासकीय ज्ञान व यंत्रणेवरील वचक यामुळे त्यांची कारकीर्द उल्लेखनीय ठरली. त्या वेळी महाराष्ट्रात सेना-भाजप युतीचे सरकार असूनही आपल्या कामाच्या पध्दतीमुळे विरोधी सदस्य असूनही आपल्या

■ शब्दांकन : डॉ. विश्वासराव आरोटे, संपादक ■

मतदार संघात विकासकामांचा खंड पडू दिला नाही.


अहमदनगर जिल्हा सहकारी बँक संचालक, जिल्हा परिषद सदस्य, अमृतसागर दूध संघाचे चेअरमन म्हणून त्यांची कारकीर्द वाखणण्याजोगीच आहे. अमृतसागर दूध संघाच्या माध्यमातून तालुक्यातील दूध उत्पादक शेतकऱ्यांच्या हिताचे अनेक निर्णय घेतले. सर्वाधिक रिबेट देऊन उत्पादकांची दिवाळी नेहमीच गोड केली आहे. अनावश्यक सर्वच खर्चांना फाटा देऊन दूध संघ लाखो रुपयांनी नफ्यात ठेवण्यात ते यशस्वी झाले आहेत.

आपले संघटन, युवकांमध्ये 'भाऊ' बद्दल असलेली सकारात्मक प्रतिमा तालुक्याचे प्रतिनिधित्व करत नसतानाही पायाला भिंगरी बांधून तालुक्याचे करत असलेले भ्रमण, प्रत्येकाच्या सुख दुःखात सहभागी होऊन दाखवित असलेली सामाजिक बांधिलकी यामुळे वैभव पिचड हे तालुक्यातील जनतेला आपले वाटतात. आदिवासी समाज बांधव व त्यांच्याप्रती असलेली आपली बांधिलकी ते कधीच विसरत नाहीत. अखिल भारतीय आदिवासी परिषदेच्या माध्यमातून आदिवासींसाठी माजी मंत्री मधुकरराव पिचड यांच्या कार्यात ते त्यांच्या खांद्याला खांदा देऊन काम करत आहेत. आदिवासींच्या प्रश्नावर हा सोज्वळ व संयमशील नेता वेळाप्रसंगी आक्रमक देखील होताना बघितला आहे. आज ते भाजपाचे सक्रीय नेतृत्व करत असून त्यांची आदिवासी समाजाप्रती असलेली कणव तळमळ व त्यांच्या प्रश्नावर काम करण्याची उमेद बघून पक्षाने त्यांची भारतीय जनता पक्ष अनुसूचित जमाती समितीच्या राष्ट्रीय मंत्री या पदी नियुक्ती करून देश पातळीवर आदिवासींच्या प्रश्नावर व त्यांच्या उत्कर्षासाठी काम करण्याची संधी दिली आहे. खऱ्या अर्थाने अकोल्यातील आदिवासींचा हा गौरवच असून तालुक्याच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा असल्याची भावना आहे. आदिवासींसह अकोलेकरांचा मान, अभिमान व स्वाभिमान असलेल्या अकोलेकरांच्या वैभवास जन्मदिनाच्या लाख लाख शुभेच्छा।

• • •

# इंदोरीचा ललित नवलेला भाभा अनुसंशोधन केंद्रामध्ये गोल्ड मेडल

अकोले : (स. गांवकरी)



शेती आणि मातीमध्ये घाम गाळून पारंपारिक चौकटी बाहेर जात आधुनिक शेती करणाऱ्या इंदोरी येथील नवले कुटुंबातील ललित अच्युत नवले यांनी होमी भाभा नॅशनल युनिव्हर्सिटी मध्ये न्यूक्लिअर मेडिसिन ची पदव्युत्तर पदवी प्राप्त करीत या विषयात विशेष सुवर्णपदक मिळवले आहे. अतिशय संशोधनात्मक असणारा हा अभ्यासक्रम ललित नवले यांनी पूर्ण करीत ग्रामीण भागातील मुलांपुढे एक नवा आदर्श ठेवला आहे.डॉ. होमी भाभा अनुसंशोधन केंद्र, मुंबई यांचा पदवीदान सोहळा नुकताच अणुशक्तीनगर, मुंबई येथे पार पडला. या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी भारत सरकारच्या नीती आयोगाचे सदस्य डॉ. विनोद कुमार पॉल ,भारत सरकारच्या परमाणु ऊर्जा विभागाचे सचिव डॉ. अजित कुमार मोहंती, होमी भाभा राष्ट्रीय संस्थानचे कुलपती प्राध्यापक यु. कामाची मुदाली, होमी भाभा राष्ट्रीय संस्थानचे डिन प्रो.ए.के. त्यागी यांच्या हस्ते ललित नवले यांनी संशोधनात्मकरीत्या न्यूक्लिअर मेडिसिन आणि मॉलिक्युलर इमेजिंग या संशोधनात्मक पदव्युत्तर अभ्यासक्रम पूर्ण करीत विशेष सुवर्णपदक मिळवले. विशेष म्हणजे संपूर्ण देश पातळी या कार्यक्रमातील महाराष्ट्रातील फक्त दोन विद्यार्थ्यांनाच हे सुवर्णपदक मिळाले. ललित नवले यांना टाटा मेमोरियल सेंटरचे डायरेक्टर प्रो एस. गुप्ता, टाटा मेमोरियल हॉस्पिटलचे डायरेक्टर प्रो. सी .एम. प्रमेश, अकॅडमी डायरेक्टर प्रो. एस. लष्कर ,प्रो. एस कुलकर्णी, विभाग प्रमुख प्रा.डॉ.व्ही रंगराजन ,प्रो. भक्ती शेटे ,प्रो.डॉ. आशिष झा, प्रो.डॉ. स्नेहा मिथुन यांचे मार्गदर्शन लाभले. आता ते केंद्र सरकारच्या टाटा मेमोरिअल हॉस्पिटल मध्ये कार्यरत असून ललित यांच्या यशाबद्दल त्यांचे परिसरातून अभिनंदन होत आहे.

# मा. आमदार वैभवरावभाऊ पिचड



**भाऊसाहेब वाकचौरे पाटील कळस**

**शांत, संयमी, मितभाषी, कष्टाळू, कर्तव्यदक्ष, चारित्र्यसंपन्न आणि अभ्यासू नेतृत्व**

(समर्थ गांवकरी)

**महाराष्ट्र विधानसभेच्या २८८ जागांपैकी २५ जागांवर अनुसूचित जमातीचे आरक्षण आहे. त्यापैकी अहमदनगर जिल्ह्यातील अकोले विधानसभा मतदारसंघातील लोकप्रतिनिधी मा. मधुकररावजी पिचड साहेब हे आदिवासी नेते म्हणून अकोले मतदारसंघात सदैव स्मरणात राहिले आहेत.**

आदिवासींचा विकास करताना शिक्षणाच्या मूलभूत सोयी सुविधा पुरविणे आरोग्य, त्यांना देण्यात येणाऱ्या सुविधा, मुला-मुलींच्या शिक्षणाकरिता, शैक्षणिक सोयी सुविधा, मुला-मुलींच्या सुरक्षितता, पेशा कायद्यांतर्गत शासनाच्या प्रत्येक स्वायत्त केवळ आदिवासी शिक्षित युवकांची नोकर भरती, दुर्गम भागात दळणवळणाचे साधने आणि पक्के रस्ते, पाझर तलाव, शेततळी, लघुपाटबंधारे बांधून पिण्याच्या आणि शेती सिंचनाचा प्रश्न, वाड्या-पाड्यांवर, हद्दीच्या अंतरावर किमान प्राथमिक दवाखाना, प्राथमिक शाळा, शेती विकासाच्या योजना आदी कार्याला प्रथम प्राधान्य दिले. आदिवासी बांधवांच्या प्रगतीसाठी काही करण्याची इच्छा असते. परंतु पक्षप्रमुखांच्या मर्जीमुळे जाता येत नाही. अर्थात स्वाभिमानी लोकप्रतिनिधी असतात. त्यात मधुकरराव पिचड अग्रणी आहेत. २००२ साली त्यांनी जात पडताळणी कायदा करून खऱ्या आदिवासींची मुक्तता संरक्षण केले आणि बनावट आदिवासींना न्याय मिळवून दिला. हा एक मोठा ऐतिहासिक निर्णय त्यांनीच घडवून आणला होता.

आदिवासी लोकप्रतिनिधी म्हणून अत्यंत जागृत राहून समाजाच्या प्रती असलेली ओढ पाहून घेणारे माजी आदिवासी विकास मंत्री मधुकरराव पिचड साहेब अकोले मतदारसंघात सह संपूर्ण राज्यात आदिवासिंचे प्रणेते नेते म्हणून ओळख निर्माण झाली आहे. त्याचे कारणही तसेच आहे. जातीयतावादी नेते नव्हे तर सर्व धर्मातील ज्ञात, धर्म, वंश असा कोणताही भेदभाव न पाळता आपल्या सत्ताकाळात सुशासनाचा आदर्श मांडला.

लोकप्रतिनिधी म्हणून काम करताना आजपर्यंतच्या पिचड कुटुंबियांनी राजकीय जीवनात कधीच भेदभाव दाखवला नाही. म्हणूनच अठरा पगड जातीचे सर्वसामान्य अकोले मतदार संघातून परकीय वर्चस्व संपवून लोकनेते मधुकरराव पिचड साहेबांच्या राजकीय सेवावृत्तीनंतर त्यांचे सुपुत्र युवा नेतृत्व वैभवरावभाऊ पिचड पुढे आले आणि जनतेचे हात हाती घेतले. शांत, संयमी, मितभाषी, कष्टाळू, कर्तव्यदक्ष, चारित्र्यसंपन्न आणि अभ्यासू नेतृत्व म्हणून मा. आमदार वैभवरावभाऊ पिचड यांनी अल्पावधीतच अकोले विधानसभेच्या मार्गदर्शनाखाली पारदर्शक कारभार, कर्तव्यदक्षता, पक्ष संघटनेसाठी केलेले काम आणि सर्वांत महत्त्वाची बाब म्हणजे स्वच्छ प्रतिमा आणि चारित्र्यसंपन्नता लाभलेले एक आश्वासक नेतृत्व म्हणजेच मा. आमदार वैभवरावभाऊ पिचड होय.

सन २०१४ ला अकोले मतदारसंघाचे नेतृत्व गतीमान नेतृत्व म्हणून त्यांच्याकडे हीरा चकाकताना २०१४-१९ या कार्यकाळात मा. आमदार होते परंतु पक्ष सत्तेत नसल्याने मोठा संघर्ष करावा लागला राजकीय कारकिर्दीची सुरुवातच अशी झाली तरी त्याप्रमाणे अधिवेशन काळात सत्ताधारी पक्षाला मुळेसून आणि आव्हानात्मक प्रश्न मांडून सभागृहाचे लक्ष वेधून घेतलेले परिणामी सभापती महोदयांनी आमदारकीचे निलंबित करण्याचा ठराव पास केला परंतु अमुक संयमी, स्पष्टवक्तेपणा, जनसेवेसाठी सदैव तत्पर असल्याने, निलंबन मागे घ्यावे लागले या घटनेतून खरा लोकप्रतिनिधी कसा असतो याचे मूर्तिमंत उदाहरण संपूर्ण महाराष्ट्राने पाहिले.

मा. वैभवरावभाऊ यांनी जेव्हा पासून मतदारसंघाची जबाबदारी स्वीकारली आहे, त्या प्रत्येक जबाबदारीत सतत जागृत असणारे नेतृत्व आणि कर्तृत्व यांच्यात पाहावयास मिळाले. गेल्या वर्षात महाराष्ट्रातील आदिवासी समाजाच्या प्रश्नांवर आवाज उठवून सरकारला "मनरेगा" मार्फत रोजगार, आदिवासींचे कुपोषण, वीजबिल, ऑनलाइन शिक्षण, आदिवासींची स्वतंत्र धान्य, पोषण आहार, जनजननी प्रश्न, शेतीला पाणी, उपजसिंचन योजना, आरक्षण अशा विविध प्रश्नांवर साडेतीनशे व्यक्तीं कडून सरकारला हे प्रश्नां मार्गी लावण्यास भाग पाडले. त्यांच्या कामाची दखल घेऊन भाजपच्या राष्ट्रीय नेत्यांनी महाराष्ट्रात कार्य करणाऱ्या अनुसूचित जमाती राष्ट्रीय मंत्री म्हणून नियुक्ती केली. राज्यातील अकोले विधानसभा मतदारसंघातील समस्या जाणणारा नेता म्हणून मा. वैभवरावभाऊ पिचड उल्लेख करावा लागेल. अकोले मतदारसंघाच्या प्रश्नांची जाण आणि आदिवासी प्रश्नांसाठी नेहमी उभे राहणे हेच काम हातात घेतले. सुरु असलेल्या प्रत्येक कार्याचा फायदा-तोटे, दूरगामी परिणाम यांचा विचार करून सखोल अभ्यास करून सुसंवाद साधण्याचे काम त्यांनी हातात घेतले आहे.

सध्याच्या कोरोना काळात मतदारसंघातील आरोग्यविषयक समस्या राज्यपाल, मुख्यमंत्री, आरोग्यमंत्री यांच्याकडे सातत्याने मांडून नागरिकांना सोयीसुविधा मिळवून देण्यासाठी आग्रही भूमिका घेत आहेत. राजूर, अकोले या ठिकाणी सुसज्ज कोविड सेंटर उभारणी, औषध प्रशासन, घरपोच सरकारी साक्षर औषधांच्या माध्यमातून कोविड रुग्णांना दिलासा मिळत आहे. वाढदिवसाच्या निमित्ताने, रक्तदान शिबीर, प्लाझ्मा दान करावे असे आवाहन केले आणि युवकांनी भरभरून प्रतिसाद देत आज हा सेवा दिन वाढदिवसाच्या निमित्ताने साजरा होत आहे.

"श्वास आपल्या जन्मदिनानिमित्त हा लेखप्रपंच...!" जीवनातला प्रत्येक क्षण आनंद घेऊन येवो... वाढदिवसाच्या प्रत्येक दिवस जीवनात यश घेऊन येवो.

तुम्हाला तुमच्या आयुष्यात नवे पर्व, नवे लक्ष, आनंद, आरोग्य आणि भरघोस यश लाभो. तुमच्या आयुष्याचे प्रत्येक क्षण हे तेजस्वी सूर्यासारखे प्रकाशमय होऊन जावो. तुमचं तेज अकोले मतदारसंघासह संपूर्ण राज्यात ही असंच उजळू दे तुमच्या यशस्वी जीवनात तुमचे यश, ज्ञान, आणि कीर्ती वृद्धिंगत होत जावो. कर्तुत्वाच्या प्रत्येक वळणावर तुमच्या व्यक्तिमत्वाचा ठसा उमटावा हीच आमची इच्छा. तुमच्या विषयी वाटणारे अपार प्रेम अतुट आणि जिव्हाळ्याचे होत आहे. भाऊ तुम्हाला वाढदिवसाच्या कोटी कोटी शुभेच्छा.

# संघर्षशील विकासाभिमुख नेतृत्व - वैभवराव पिचड

*सत्तेवर असताना सत्तेच्या माध्यमातून विकास योजना राबविण्यासाठी सतत आग्रही भूमिका घेणाऱ्या माजी आमदार वैभवराव पिचड यांनी सत्ता नसताना विकासाच्या प्रश्नांवर, जनतेच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नांवर संघर्षाची भूमिका तेवढ्याच ताकतीने पार पाडली आहे. पार पाडत आहेत. विकास आणि संघर्ष या दोन्ही भूमिका सहजतेने पार पाडणारे असे राजकीय नेतृत्व तसे दुर्मिळच म्हणावे लागेल.*

(स. गांवकरी)







गत दोन पंच वार्षिक झालेल्या विधानसभा निवडणुकीत वैभव पिचड यांना धक्कादायक पराभव स्वीकारावा लागला. राज्यातही विरोधी पक्षाचे सरकार आले पण या पराभवाने ते खचले नाहीत. एक जबाबदार विरोधी पक्ष नेत्याची भूमिका ते सक्षमपणे तालुक्यात बजावत आहेत. राज्य यंत्रणेला जागे करण्यासाठी वेळोवेळी सरकार बरोबर केलेला पत्रव्यवहार असो की प्रसंगी जनतेला भेडसावणाऱ्या लहान मोठ्या प्रश्नांवर रस्त्यावर उतरून केलेला संघर्ष असो, यातून दिसत आहे ती जनहीताची तळमळ. अलिकडेच त्यांचे अनेक जेष्ठ सहकारी त्यांना सोडून सत्ताधारी पक्षात गेले. पण या राजकीय वावटळीतही ते ठामपणे उभे आहेत. कार्यकर्त्यांना धीर देत विचलित न होता ताकदीने उभे राहण्याचे आवाहन त्यांनी आपल्या कार्यकर्त्यांना केले. त्यांच्या या भूमिकेमुळे विधानसभा निवडणुकीत त्यांच्यावर नाराज असणारी तरुणाई पुन्हा त्यांच्या जवळ येऊ लागली आहे. गावोगाव त्यांचे उत्स्फूर्त स्वागत होऊ लागले आहे.

म्हणतात ना, मोठ्या झाडाखाली लहान झाड वाढत नाही. पण त्याला अपवाद ठरले माजी आमदार वैभवराव पिचड. नम्र स्वभाव, अंगी सुसंस्कृतपणा, मात्र अन्यायाविरुद्ध लढा देणारा म्हणून त्यांनी आपली ओळख संपूर्ण तालुक्यालाच नव्हे तर राज्याला करून दिली.

२०१४ साली झालेल्या विधानसभा निवडणुकीत आमदार म्हणून निवडून आले मात्र राज्यात सत्ता नसल्याने साडे चार वर्षे तालुक्याच्या विकासासाठी संघर्ष करावा लागला. जवळपास १५० आंदोलने, मोर्चे, उपोषणे, निवेदने देऊन त्यांनी विरोधी आमदार म्हणून तालुक्याची खिंड लढविली. दुर्दैव असे की त्यांना राज्य पातळीवरून कोणताही साथ मिळाला नाही. राज्यात भाजप सेना युतीचे सरकार येणार अशी परिस्थिती तेव्हा तयार झाली होती. तालुक्यात विकासाच्या कल्पना व योजना मोठ्या प्रमाणात मात्र कोणतेही ठोस कामे उभे राहत नव्हते. राष्ट्रवादी व काँग्रेस चे सरकार येईल अशी शक्यता नव्हती. अशा परिस्थितीत तालुक्याचा विकास कसा करायचा असा यक्ष प्रश्न समोर होता. त्यावेळी अनेकांनी भाजप मध्ये जाण्याचा सल्ला दिला, शिवसेनेनेही ऑफर दिली होती, मात्र सर्वांच्या विचाराने राष्ट्रीय पक्ष म्हणून भाजपमध्ये प्रवेश केला. तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मोठ्या उत्साहात व सन्मानाने त्यांचे स्वागत केले. आणि तालुक्यातील अनेक प्रश्न प्रवेशा नंतर च्या तीन महिन्यात मार्गी लावले. राज्यात २०१९ चे निकाल हाती आले तेव्हा शिवसेना व भाजप चे आमदार सर्वात जास्त निवडून आले. मात्र राजकारणात महत्वाकांक्षा मोठ्या असल्याने शिवसेना भाजपबरोबर राहिली नाही. तसेच तालुक्यात ही निवडणुकीत पराभवाला सामोरे जावे लागले. मात्र पराभव पचनी पाडून न खचता, न डगमगता तालुक्यासाठी पुन्हा एकदा संघर्ष सुरु केला. कोरोनाच्या काळात तालुक्यात अनेक सामाजिक उपक्रमातून रुग्णांना, गरिबांना, आदिवासी बांधवांना मदत केली. त्यांच्या विविध प्रश्नांवर पत्रव्यवहार करून मंत्री महोदयांना निर्णय घेण्यास भाग पाडले. जे काम विद्यमान आमदाराने करणे गरजेचे असताना ती कामे माजी आमदार पिचड यांनी मार्गी लावली. तालुक्याच्या दृष्टीने जी विकास कामे प्रलंबित आहे, होणे गरजेचे आहे त्याबाबत मुख्यमंत्री, राज्यपाल, विरोधी पक्षनेते, संबंधित विभागाचे मंत्री, सचिव, जिल्हाधिकारी, तहसीलदार, इतर विभागाचे प्रमुख अधिकारी यांचे कडे पत्रव्यवहार करून सातत्याने पाठपुरावा चालू ठेवला. त्यांच्या या धडपडी मुळे जनतेमध्ये त्यांचे बद्दल ची आपुलकी वाढत चालल्याचे दिसत आहे. त्यांच्या संघर्षाची व आदिवासी समाजासाठी असलेली तळमळ पाहून भाजप पक्षनेतृत्वाने त्यांना राष्ट्रीय पातळीवर काम करण्याची संधी देण्याच्या दृष्टीने भाजप अनुसूचित जनजाती मोर्चाच्या राष्ट्रीय मंत्री म्हणून नियुक्ती करून त्यांचा सन्मान केला. भाजपच्या कारकिर्दीत पहिल्याच वेळी राष्ट्रीय पातळीवर काम करण्यास संधी मिळणारे पिचड हे एकमेव अपवाद असतील. त्यांच्या वर एका राज्याच्या विधानसभा निवडणुकीत निरीक्षक पदाची जबाबदारी येणार होती, मात्र पिचड यांनी भाजप ची कार्यप्रणाली, विचारधारा समजून घेऊन मला काम करू द्या, असे म्हणत मोठी संधी त्यांनी नम्रपणे नाकारली. दिल्ली येथील पक्षाच्या पहिल्याच मीटिंग मध्ये त्यांनी आपल्या कामाची वेगळी छाप पाडली. त्यांनी आपली निवड सार्थ ठरविली आहे.

तालुक्यातील राजकीय घडामोडी त्यांना त्रासदायक ठरतात की, अशी शंका सर्व सामान्य जनतेच्या मनात येत होती. मात्र ज्यांनी साथ सोडली ते पाहून वैभवराव पिचड यांनी सर्व जिवलग कार्यकर्त्यांना धीर दिला. मी खंबीर आहे. असा विश्वास दिला. व पाहता पाहता तरुणानीं त्यांना साथ देण्याचा निर्णय घेतला. आणि गावोगावचे युवक, महिला यांनी प्रत्यक्ष भेट घेऊन आम्ही तुमच्या बरोबर आहोत असा पाठिंबा दिला.

तालुक्यात भाजप पक्ष रुजणार नाही अशी चर्चा होत असताना प्रत्यक्षात मात्र वेगळेच चित्र दिसायला लागले. जे सोडून गेले त्यांची जागा भरून काढण्यासाठी नवीन युवक एकत्र आले. आणि गावागावात भाजपच्या शाखा सुरु व्हायला लागल्या. नवीन जोम भाजप कार्यकर्त्यांनी आणला. त्यांचे नेतृत्व मान्य करीत असल्याचे वातावरण तालुक्यातील जनता पाहू लागली. विरोधकावर टीका करताना कधी पातळी सोडून बोलले नाही. मोठ्यांना सन्मानाने वागणूक देणे ही त्यांना त्यांच्या आई वडिलांकडून मिळालेली शिकवण जनतेला दिसू लागली. सर्व कार्यकर्त्यांना मानाने वागणूक देणारे नेतृत्व त्यांच्या रूपाने तरुणांना आकर्षित करू लागल्याचे चित्र दिसत आहे. ४० वर्षे काय विकास केला ही जनता विसरली नाही मात्र विरोधी नेते जाणून बुजून राजकारण करत आहेत. हे आता जनतेला हळूहळू कळायला लागले. हे मात्र नक्की, व पुन्हा एकदा तालुक्यात पिचड यांच्या रूपाने आमदार म्हणून त्यांना विजयी मिळवून देईल व पुन्हा नव्या उत्साहात विकास कामासाठी तालुक्यात 'वैभवपर्व' सुरु होईल असा विश्वास भाजपचे कार्यकर्ते व पिचड समर्थक व्यक्त करत आहेत.

शब्दांकन : डॉ विश्वासराव आरोटे राज्य सरचिटणीस महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई तथा संपादक दैनिक समर्थ गांवकरी



ठाणे : दिवा शहरात पावसाळा पुर्व नालेसफाईला सुरुवात करण्यात आली असून अतिवृष्टीत नाले तुंबून आपत्कालीन परिस्थिती निर्माण होऊ नये यासाठी दिवा प्रभाग समितीचे सहायक आयुक्त शिवप्रसाद नागरगोजे यांच्या मार्गदर्शनाखाली नालेसफाईची कामे हाती घेण्यात आली आहेत. प्रभाग २८ मधील नाल्यांमधून मोठ्या प्रमाणावर कचरा व गाळ काढण्यात येत आहे याशिवाय नाल्यातून पाण्याच्या मार्गातील अडथळे दूर करण्याची मोहीम देखील ठाणे महापालिकेने हाती घेतली आहे (फोटो - संतोष पडवळ)

# थोडक्यात पण महत्वाचे



## देव नरसिंह मंदिर ट्रस्ट परिसरात विविध मंदिरांचे भूमिपूजन

मध्यप्रदेश (स. गांवकरी) : देव नरसिंह मंदिर ट्रस्टच्या मानसदाम परिसरात नानजीभाई खेमजीभाई ठक्कर ठाणावाला यांच्या प्रमुख शुभहस्ते विविध मंदिरांच्या उभारणीसाठी भूमिपूजन सोहळा उत्साहात पार पडला. या कार्यक्रमास अयोध्या येथील राम जानकी मंदिराचे पीठाधीश्वर जन्मेजय महाराज, अखिल भारतीय गुजरात समाजाचे राष्ट्रीय अध्यक्ष संजय पटेल, मंदिर ट्रस्टी चौधरी, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस तथा दैनिक समर्थ गांवकरी संपादक डॉ. विश्वासराव आरोटे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. नानजीभाई ठक्कर ठाणावाला यांनी आपल्या दानशूर वृत्तीमुळे मध्यप्रदेशासह देशभरातील अनेक धार्मिक, सामाजिक व शैक्षणिक उपक्रमांना मोठे योगदान दिले असून, विविध मंदिरांसाठी कोट्यवधी रुपयांची मदत देत धार्मिक स्थळांच्या उभारणीत मोलाची भूमिका बजावली आहे. त्यांच्या कार्यामुळे या भागात अनेक भव्य धार्मिक प्रकल्प साकारले असून समाजोपयोगी कामांचा आदर्श निर्माण झाला आहे.यावेळी डॉ. विश्वासराव आरोटे यांनी धार्मिक कार्यक्रमासाठी दहा पोते तांदळाची रोख रक्कम पीठाधीश्वर जन्मेजय महाराज यांच्याकडे सुपूर्द केली. “आपण समाजाचे देणे लागतो” ही भावना जपत सामाजिक व धार्मिक कार्यासाठी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ आणि दैनिक समर्थ गावकरीच्या वतीने भविष्यातही सहकार्य राहील, असे त्यांनी सांगितले. तसेच ३ मे ते ११ मे २०२६ या कालावधीत राम जानकी प्रतिमंदिर येथे महाअभिषेक सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असून, त्या अनुषंगाने विविध धार्मिक कार्यक्रमांचे नियोजन करण्यात आले आहे.

## स्थगितीचे आदेश कागदावरच, ‘मनमानीचा फास्ट ट्रॅक’ सुरूच!”

वसमत (स. गांवकरी) : महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान अंतर्गत सुरू असलेल्या रस्ते व नाली विकास कामांमध्ये प्रशासनाचा दुहेरी चेहरा उघड होत असल्याचे धक्कादायक चित्र समोर आले आहे. मुख्य अभियंता व अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभागाने स्पष्टपणे कामे तात्काळ स्थगित करण्याचे आदेश दिल्याची माहिती असताना, प्रत्यक्षात मात्र ठेकेदारांकडून कामे अधिकच वेगाने सुरू असल्याने संपूर्ण यंत्रणाच संशयाच्या भोवऱ्यात सापडली आहे. “वरिष्ठांचे आदेश म्हणजे फक्त फाईलपुरती औपचारिकता का?” असा संतप्त सवाल आता नागरिक उघडपणे विचारू लागले आहेत. स्थगितीचे आदेश दिल्यानंतरही मशीनचा आवाज, मजुरांची वर्दळ आणि साहित्याची वाहतूक सुरूच असल्याने, वरिष्ठांचे आदेश पायदळी तुडवले जात असल्याचे स्पष्ट दिसत आहे. याहून गंभीर बाब म्हणजे, सार्वजनिक बांधकाम मंडळाने देयके थांबवण्याचे निर्देश दिल्याचे सांगितले जात असताना, नगर परिषद प्रशासनाने मात्र प्रत्यक्षात देयके रोखली नसल्याची जोरदार चर्चा आहे. “देयके सुरू, काम सुरू... मग स्थगिती नेमकी कुठे?” असा थेट सवाल आता रस्त्यावरून ते सोशल मीडियापर्यंत घुमत आहे. सततच्या तक्रारी, पुरावे आणि निदर्शनांकडे जाणीवपूर्वक डोळेझाक केली जात असल्याने अधिकारी आणि ठेकेदार यांच्यातील संभाव्य संगनमताची कुजबुज आता उघड आरोपांमध्ये बदलत आहे. नियम केवळ कागदावर आणि व्यवहार मात्र ठेकेदारांच्या मर्जीप्रमाणे अशी परिस्थिती वसमतमध्ये निर्माण झाली आहे. सर्वात मोठा प्रश्न म्हणजे, इतक्या स्पष्ट आदेशांचे खुलेआम उल्लंघन होत असतानाही एकाही अधिकाऱ्यावर कारवाई होत नाही, ही बाबच संशय अधिक गडद करणारी ठरत आहे. “कोणाचे राजकीय किंवा प्रशासकीय पाठबळ आहे?” हा प्रश्न आता सामान्य नागरिकांपासून ते जाणकारांपर्यंत सर्वांच्या चर्चेचा विषय बनला आहे. जर अशीच परिस्थिती कायम राहिली, तर “आदेश वेगळे आणि काम वेगळे” हीच नवी प्रशासकीय परंपरा ठरेल, असा इशारा नागरिकांनी दिला आहे. या संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय, निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी, अन्यथा जनतेचा प्रशासनावरील उरलेला विश्वासही पूर्णपणे कोसळण्याची भीती व्यक्त होत आहे.




## प्रा. रमेश भुजबळ यांचा सेवापूर्ती कृतज्ञता समारंभ संपन्न

श्रीगोंदा (स. गांवकरी) : महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालयातील ज्युनिअर विभागातील इतिहास विषयाचे प्राध्यापक रमेश भुजबळ यांच्या सेवापूर्ती निमित्त कृतज्ञता समारंभ उत्साहात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रयत शिक्षण संस्थेच्या जनरल बॉडीचे सदस्य बाबासाहेब भोस होते. अध्यक्षीय भाषणात भोस यांनी प्रा. भुजबळ यांनी शिक्षण क्षेत्रात दिलेल्या उल्लेखनीय योगदानाचा गौरव करत, त्यांनी रयत शिक्षण संस्थेच्या मूल्यांची जपणूक करणारे शिक्षक असल्याचे सांगितले. प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. ज्ञानदेव म्हस्के यांनीही प्रा. भुजबळ यांच्या समर्पित सेवाभावाचे कौतुक केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रकाश साळवे यांनी केले. यावेळी रयत शिक्षण संस्थेचे माजी सहसचिव प्राचार्य डॉ. के. एच. शिंदे, प्राचार्य डॉ. दीनानाथ पाटील, उत्तमराव आवारी, उत्तर विभागीय अधिकारी नवनाथ बोडखे, मिलिंद दरेकर, प्रा. विनोद सासवडकर, अजिंक्य भुजबळ आदींनी मनोगते व्यक्त करून शुभेच्छा दिल्या. समारंभात प्रा. रमेश भुजबळ व सौ. सीमा भुजबळ यांचा सत्कार करण्यात आला. तसेच त्यांच्या आई-वडिलांचाही गौरव करण्यात आला. सत्काराला उत्तर देताना प्रा. भुजबळ यांनी आपल्या जडणघडणीचा प्रवास उलगडून सांगितला.

# पालक व शिक्षकांच्या प्रयत्नामुळेच शाळेला गतवैभव : वडजे

अकोले : (स. गांवकरी)

अकोले शहरातील जीवन शिक्षण मंदिर आणि आताची जिल्हा परिषद प्राथमिक शाळा अकोले या शाळेला गत वैभव प्राप्त करून देण्यासाठी शिक्षक पालक आणि अकोलेकरांनी जे कष्ट घेतले त्याचे कौतुक करावे तेव्हढे कमीच आहे. या शाळेला यशाची एक वेगळी परंपरा असून ती टिकून ठेवण्याचे काम या सर्वांनी केले आहे, अशी भावना नगराध्यक्ष बाळासाहेब वडजे यांनी व्यक्त केली.

अकोले शहरातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा अकोले येथील शाळेत घेण्यात आलेल्या विविध स्पर्धांमध्ये विशेष नैपुण्य मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांचा आज शनिवारी सकाळी मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

यावेळी अकोल्याचे नगराध्यक्ष वडजे बोलत होते. शिवसेनेचे तालुका अध्यक्ष सुशांत गजे, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष प्रकाश साळवे, कैलास वैद्य, उपाध्यक्ष संतोष आभाळे, समिती सदस्य ग्रामविकास अधिकारी संजय हासे, मंडळ अधिकारी कांचन हासे, मच्छिंद्र शिंगाडे, अश्विनी साळवे आदींचा यावेळी सन्मान करण्यात आला.

वडजे म्हणाले, अकोले शहरातील ही जिल्हा परिषदेची शाळा अत्यंत जुनी असून गेल्या अनेक वर्षांचा इतिहास आहे. अनेक मान्यवर या शाळेत शिकले. यशाची एक वेगळी परंपरा या शाळेला आहे. ती टिकवून ठेवण्याचे काम सध्याची कमिटी, शिक्षक, पालक, अकोलेकर करीत आहेत. या शाळांचे पट टिकून ठेवण्याचे आव्हान सर्वांसमोर असून गुणवत्ता आणि विविध उपक्रमच या शाळांना टिकवतील, अशी भावना वडजे यांनी व्यक्त केली. या कार्यक्रमाला श्रीमती डावरे, आंबरे, डमाळे, आशा खैरे, पवार, अनिल रोकडे आदी उपस्थित होते.

**शिक्षकांचे कष्ट अन् पालकांची साथ**

अनेक अडचणींवर मात करीत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा अकोले यांनी संघर्ष केला. परंतु शिक्षकांचे कष्ट आणि पालकांची साथ यामुळे शाळेच्या यशाचा आलेख उंचावत असून भविष्यात या शाळेत अनेक शैक्षणिक प्रयोग करणार असून या शाळेतील प्रत्येक विद्यार्थी मोठा झाला पाहिजे हे आमचं स्वप्न असल्याचे शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष प्रकाश साळवे म्हणाले.



## मध्यप्रदेशातील सर्वात मोठ्या सौरऊर्जा प्रकल्पाचे भूमिपूजन



मध्यप्रदेश : (स. गांवकरी)

राज्यातील सर्वात मोठ्या सौरऊर्जा प्रकल्पाचे भूमिपूजन सेठ नानजीभाई खेमजीभाई ठक्कर ठाणावाला यांच्या भूमीत मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडले. अयोध्या राम जानकी मंदिराचे पीठाधीश्वर जन्मेजय महाराज, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस तथा दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे, अखिल भारतीय गुजरात समाजाचे राष्ट्रीय अध्यक्ष संजय पटेल, तसेच सर्वोच्च न्यायालयाचे विधिज्ञ दिगंबर चौधरी यांच्या शुभहस्ते हा सोहळा संपन्न झाला.

सुमारे २० एकर क्षेत्रावर उभारण्यात येणारा हा प्रकल्प मध्यप्रदेशातील विद्युत व्यवस्थेस मोठा दिलासा देणारा ठरणार असून, वीज वितरण कंपनीला याचा थेट लाभ होणार आहे. ‘ना नफा, ना तोटा’ या तत्त्वावर उभारण्यात येणाऱ्या या प्रकल्पामुळे समाजाला कमी दरात वीज उपलब्ध होण्यास मदत होणार असून शेतकरी वर्गालाही मोठा फायदा मिळणार आहे. राज्य सरकारनेही या प्रकल्पाचे स्वागत केले असून मध्यप्रदेशच्या ऊर्जा क्षेत्रात हा प्रकल्प क्रांतिकारक ठरेल, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

## अखिल भारतीय गुजराती समाजाच्या नावाचा गैरवापर

नागपूर : (स. गांवकरी)

- बनावट पदाधिकारी व आर्थिक गैरव्यवहारप्रकरणी कारवाईची मागणी!
- राष्ट्रीय अध्यक्ष संजय पटेल यांची तक्रार
- नागपूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल, दोषींवर कठोर कारवाईची मागणी!



अखिल भारतीय गुजराती समाज या राष्ट्रीय स्तरावरील नोंदणीकृत संस्थेच्या नावाचा व पदनामाचा गैरवापर करून महाराष्ट्रातील काही व्यक्ती समाजाची दिशाभूल करत असल्याचा गंभीर आरोप संस्थेचे राष्ट्रीय अध्यक्ष संजयभाई पटेल यांनी केला आहे. या प्रकरणी नागपूर शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली असून दोषींवर तात्काळ फौजदारी कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.

संजय पटेल यांनी दिलेल्या माहितीनुसार, अखिल भारतीय गुजराती समाज ही संस्था ११ फेब्रुवारी १९६८ रोजी दिल्ली येथे स्थापन झालेली राष्ट्रीय नोंदणीकृत संस्था असून तिचा नोंदणी क्रमांक 42/09/69 आहे. तसेच संस्थेचे नाव, ट्रेडमार्क, पॅनकार्ड, बँक खाते आणि भारत सरकारच्या नीती आयोग दर्पण पोर्टलवरील नोंदणी अधिकृत स्वरूपात अस्तित्वात असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

३० नोव्हेंबर २०२४ रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेत विधिवत निवडणुकीद्वारे स्वतःची राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून निवड झाल्याचेही संजय पटेल यांनी सांगितले. या निवडीची पुष्टी निवडणूक अधिकारी परेशभाई ठक्कर यांच्या प्रमाणपत्राद्वारे झालेली असल्याचे त्यांनी नमूद केले.

दरम्यान, मगनलाल ठक्कर (ठाणे) हे स्वतःला केंद्रीय उपाध्यक्ष म्हणून सांगत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यांच्यासह जयप्रकाश मालवीय, मनोज जोबनपुत्र ठक्कर, हेमा बहिण राजा, दीपा बहिण गणात्रा, जयंतीलाल राजा, रशीद, लीला बहिण आणि हरेंद्र आदींनी संस्थेच्या नावाने बनावट लेटरहेड, पदनाम आणि कार्यक्रमांचा वापर करून समाजातील नागरिकांकडून आर्थिक वसुली केल्याचा आरोप आहे.

विशेष म्हणजे, १२ एप्रिल २०२६ रोजी नागपूर येथील रेशीमबाग परिसरातील सुरेश भट सभागृहात आयोजित ‘विदर्भ स्त्रिया गीत गायन स्पर्धा’ या कार्यक्रमाच्या नावाखाली नागपूर, वाशीम व इतर शहरांतील नागरिकांकडून निधी गोळा करण्यात आल्याचा दावा करण्यात आला आहे. या कृतीमुळे मूळ संस्थेच्या पदाधिकाऱ्यांची बदनामी होत असून समाजात संभ्रम आणि मतभेद निर्माण होत असल्याचे पटेल यांनी सांगितले. या संदर्भात संबंधितांना पूर्वीच सूचना देण्यात आल्याचे सांगत, तरीही गैरप्रकार सुरूच राहिल्याने मुख्यमंत्री, पोलीस प्रशासन आणि इतर संबंधित विभागांकडे तक्रारी दाखल करण्यात आल्या असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. तसेच लवकरच मध्य प्रदेशच्या राज्यपालांकडेही निवेदन देऊन संपूर्ण प्रकरणाची माहिती सादर केली जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

संजय पटेल म्हणाले की, "संघटनेच्या नावावर कोणालाही चुकीचे काम करू दिले जाणार नाही. समाजाच्या नावावर पैसे उकळणारे आणि बनावट पदाधिकारी बनून लोकांची फसवणूक करणाऱ्यांना संघटना आपली ताकद दाखवेल. अशा व्यक्तींवर कठोर कायदेशीर कारवाई झालीच पाहिजे."

या प्रकरणामुळे महाराष्ट्रातील गुजराती समाजात खळबळ उडाली असून, संघटनेच्या नावाने फसवणूक करणाऱ्या व्यक्तींवर तातडीने कारवाई करून समाजातील विश्वास पुनर्स्थापित करण्याची मागणी समाजबांधवांकडून होत आहे.

## भोपाळमध्ये उभारणार भव्य गोशाळा व शैक्षणिक संकुल





भोपाळ (मध्य प्रदेश) : (स. गांवकरी)

**एन.के.टी. ट्रस्टच्या उपक्रमाचा देशभर गौरव!**

एन.के.टी. ट्रस्टचे शैक्षणिक व सामाजिक कार्य संपूर्ण हिंदुस्तानात आदर्श मानले जात असून, त्याच धर्तीवर मध्य प्रदेशातील भोपाळ येथे अखिल भारतीय गुजरात समाजाच्या वतीने सहा एकर क्षेत्रावर भव्य गोशाळा, शाळा, महाविद्यालय, वृद्धाश्रम व शैक्षणिक संकुल उभारण्याचा महत्त्वाकांक्षी संकल्प करण्यात आला आहे. या उपक्रमामुळे भावी पिढीसाठी आदर्श भारताचे नागरिक घडविण्याचे कार्य होईल, असा विश्वास व्यक्त करत मध्य प्रदेशच्या राज्यपाल मंगुभाई पटेल यांनी या संकल्पाचे स्वागत केले. समाजातील सर्व घटकांना दर्जेदार शिक्षण उपलब्ध करून देण्यासाठी अशा उपक्रमांची देशभर गरज असल्याचे त्यांनी नमूद केले. एनकेटी ग्रुपने ठाणे येथे उर्दू, गुजराती, मराठी आणि इंग्रजी माध्यमांच्या शाळांद्वारे लाखो विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली असून, त्याच यशस्वी मॉडेलचा विस्तार आता भोपाळमध्ये करण्यात येणार आहे. या प्रकल्पासाठी निश्चित करण्यात आलेल्या जागेची पाहणी अयोध्या येथील राम जानकी मंदिराचे पीठाधीश्वर जन्मेजय महाराज यांनी केली. येत्या सहा महिन्यांत येथे गोशाळा, शैक्षणिक संकुल आणि वृद्धाश्रमाची भव्य इमारत उभारण्यासाठी सर्वतोपरी मदत केली जाईल, असे त्यांनी सांगितले.

यावेळी उद्योजक नानजीभाई ठक्कर ठाणावाला यांनी, “या उपक्रमासाठी आपण केवळ निमित्त आहोत; या शैक्षणिक संकुलातून उद्याच्या आदर्श भारताचे नागरिक घडतील,” असे सांगत गोमातेचे संरक्षण हे प्रत्येकाचे कर्तव्य असल्याचे प्रतिपादन केले.

या महत्त्वपूर्ण पाहणी व संकल्प सोहळ्यास महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस व दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे, नामवंत उद्योजक ॲड. चौधरी यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

## मातृशक्तीस भावपूर्ण आदरांजली



उदयपूर (मध्य प्रदेश) :(स. गांवकरी)

मध्य प्रदेशातील उदयपूर येथे नामवंत विधितज्ञ यांच्या मातोश्री स्वर्गीय माताजी यांच्या निधनानंतर विविध क्षेत्रातील मान्यवरांनी कुटुंबीयांची सांत्वन भेट घेत श्रद्धांजली अर्पण केली. तब्बल ११० वर्षांचे प्रदीर्घ आयुष्य लाभलेल्या मातोश्रींनी आपल्या कुटुंबाला संस्कार, सेवा आणि समाजकारणाची प्रेरणा देत एक आदर्श परिवार घडविल्याची भावना यावेळी उपस्थितांनी व्यक्त केली.

समाजातील अनेक गरजू घटकांना मदतीचा हात देत सेवाभावी कार्य करणाऱ्या या परिवारामागे मातोश्रींचे संस्कार व मार्गदर्शन महत्त्वाचे होते, असे मान्यवरांनी नमूद केले. त्यांच्या कार्यकर्तृत्वपूर्ण जीवनाला आदरांजली वाहताना अनेकांनी त्यांच्या साधेपणा, कर्तृत्व आणि कुटुंब एकत्र ठेवण्याच्या गुणांचा गौरव केला.

यावेळी अयोध्या राम जानकी मंदिराचे पीठाधीश्वर जनमेजय महाराज, शेठ नानजीभाई ठक्कर ठाणावाला, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस तथा दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे, अखिल भारतीय गुजरात समाजाचे राष्ट्रीय अध्यक्ष संजय पटेल, नामांकित विधितज्ञ चौधरी यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. उपस्थितांनी स्वर्गीय मातोश्रींना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करत कुटुंबीयांच्या दुःखात सहभागी असल्याची भावना व्यक्त केली.

# उदयपूर येथील राम जानकी मंदिरात भव्य यज्ञसोहळा

## अन्नदानासाठी डॉ. विश्वासराव आरोटे यांच्याकडून १० पोते तांदूळ दान!







उदयपूर (मध्य प्रदेश) : (स. गांवकरी)

मध्य प्रदेशातील उदयपूर येथील राम जानकी मंदिरात भव्य यज्ञ, होम-हवन व धार्मिक सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असून, या कार्यक्रमासाठी देशभरातील साधुसंत आणि लाखो भाविक उपस्थित राहणार आहेत. राम जानकी मंदिराचे पीठाधीश्वर जगनजेय महाराज यांच्या संकल्पनेतून व समाजसेवक नानजीभाई खेमजीभाई ठक्कर ठाणावाला यांच्या मार्गदर्शनाखाली उभारण्यात आलेले हे कोट्यवधी रुपयांचे मंदिर परिसर भाविकांचे श्रद्धास्थान बनले आहे. या नऊ दिवस चालणाऱ्या धार्मिक सोहळ्यात विविध आध्यात्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून, अन्नदानासाठी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस तथा दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे यांनी १० पोते तांदूळ देऊन सहकार्य केले. तसेच समाजसेवक नानजीभाई खेमजीभाई ठक्कर ठाणावाला यांनी ६० पंखे तसेच अन्नदानासाठी लाखो रुपयांची मदत जाहीर केली. अखिल भारतीय गुजरात समाजाचे राष्ट्रीय अध्यक्ष संजय पटेल, ॲड. चौधरी यांनीही आपल्या समूहाच्या वतीने योगदान दिले. देशभरातील संत-महंतांच्या उपस्थितीत हा सोहळा पार पडणार असून, दानशूर व्यक्तींनी मंदिर व अन्नदानासाठी सहकार्य करावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. या सोहळ्याची जय्यत तयारी सुरू असल्याची माहिती पीठाधीश्वर जगनजेय महाराज यांनी दिली.

## थोडक्यात पण महत्वाचे



### विद्यालयाचा एन.एम.एम.एस. परीक्षेत उल्लेखनीय यश

श्रीगोंदा तालुका (स. गांवकरी) : बेलवंडी बुद्रुक (ता. श्रीगोंदा) : येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व कला-विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयाने एन.एम.एम.एस. (राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती) परीक्षा 2025-26 मध्ये उल्लेखनीय यश संपादन केले आहे. विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी करत विद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला आहे. या परीक्षेस एकूण 83 विद्यार्थी बसले होते. त्यापैकी 68 विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून विद्यालयाचा निकाल 81.92 टक्के लागला आहे. यामध्ये 38 विद्यार्थ्यांनी 100 पेक्षा अधिक गुण मिळवले असून 11 विद्यार्थी शिष्यवृत्तीस पात्र ठरले आहेत. या विद्यार्थ्यांना प्रतिवर्षी 12 हजार रुपये प्रमाणे पाच वर्षे शिष्यवृत्ती मिळणार आहे. शिष्यवृत्ती प्राप्त विद्यार्थ्यांमध्ये जगताप सोम्या संतोष, शिपणकर वैष्णवी कैलास, गायकवाड पार्थ पोपट, ढवळे सार्थक दत्तात्रय, उदमले सार्थक महेश, शेंडगे सार्थक अजय, वारे सार्थक सुनील, हिरडे यश विलास, दातीर विकास राजेंद्र, इथापे अंकुश नितीन आणि इथापे प्रांजल भारत यांचा समावेश आहे. या यशामागे विभाग प्रमुख श्री. विलास लबडे, सहाय्यक शिक्षक श्री. कडाळे व श्री. कौटे, गुणवत्ता कक्ष प्रमुख श्री. ओहोळ, पर्यवेक्षक मा. श्रीमती हरिभक्त, उपप्राचार्य मा. श्री. बापू दिघे तसेच प्राचार्य मा. श्री. राजेंद्र खेडकर यांचे मार्गदर्शन लाभले. यशस्वी विद्यार्थ्यांचे, त्यांच्या पालकांचे तसेच मार्गदर्शक शिक्षकांचे रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य व आमदार राहुलदादा जगताप, जनरल बॉडी सदस्य व उपाध्यक्ष अण्णासाहेब शेलार, विभागीय अधिकारी श्री. नवनाथ बोडखे, स्कूल कमिटी, शाळा व्यवस्थापन समिती, शिक्षक-पालक संघ, विद्यार्थी सुरक्षा समिती तसेच पंचक्रोशीतील ग्रामस्थांकडून कौतुक व अभिनंदन करण्यात येत आहे.

### आयडीएफसी फर्स्ट बँकेचा पीएटी रु. 319 कोटी असून 5% वाढ

मुंबई (स. गांवकरी) : आयडीएफसी फर्स्ट बँकेच्या संचालक मंडळाने आज झालेल्या बैठकीत 31 मार्च 2026 रोजी संपलेल्या तिमाही आणि संपूर्ण आर्थिक वर्षासाठीचे ऑडिट केलेले आर्थिक निकाल मंजूर केले आहेत. निकालांवर भाष्य करताना, व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. व्ही. वैद्यनाथन म्हणाले, “बँकेची मालमत्ता गुणवत्ता स्थिर राहिली आहे. आम्ही नेहमीच नमूद केले आहे की मायक्रो-फायनान्स पोर्टफोलिओ वगळता सर्व व्यवसायांची मालमत्ता गुणवत्ता चांगली कामगिरी करत आहे, कारण आर्थिक वर्ष 25 आणि आर्थिक वर्ष 26 दरम्यान हा मुद्दा संपूर्ण उद्योगासाठी होता. त्यामुळे मायक्रो-फायनान्सचा प्रश्न मागे पडल्याने जीएनपीए आणि एनएनपीए अनुक्रमे 1.61% आणि 0.48% या आरोग्यदायी स्तरावर आले आहेत. आर्थिक वर्ष 26 च्या चौथ्या तिमाही दरम्यान तरतुदी मागील दोन वर्षांतील सर्वात कमी स्तरावर 1.63% (कर्जांवर) झाले असून, ते मालमत्तेच्या 1.18% इतके आहे. आर्थिक वर्ष 27 च्या पहिल्या तिमाही चा पहिला महिना ठेवींसाठी मजबूत सुरुवात दर्शवतो, आणि बँक मागील प्रवृत्तीनुसार ठेवींच्या व्यवसायात निरोगी वाढ होण्याबाबत आत्मविश्वास बाळगते.”

### ‘शिवाजी कोण होता?’ पुस्तकाचे उद्या अकोल्यात सामूहिक वाचन

अकोले (स. गांवकरी) : अकोले येथील बळीराजा अभ्यास मंडळ व तालुक्यातील समविचारी संस्था, संघटनांच्या संयुक्त विद्यमाने साम्यवादी विचारवंत कॉ. गोविंद पानसरे लिखित ‘शिवाजी कोण होता?’ या पुस्तकाचे सामूहिक वाचन आयोजित करण्यात आले आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या कार्य-कर्तृत्वाचे, राज्यकारभाराचे व पराक्रमाचे यथार्थ व अभ्यासपूर्ण विवेचन करणारा हा ग्रंथ देशभरात लोकप्रिय ठरला असून विविध भाषांमध्ये त्याचे अनुवाद उपलब्ध आहेत. अलीकडेच या पुस्तकाचे प्रकाशक प्रशांत आंबी यांना बुलढाणा येथील आमदार संजय गायकवाड यांनी फोनद्वारे शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी दिल्याची गंभीर घटना घडली आहे. तसेच लेखकाबाबत अशोभनीय वक्तव्य करण्यात आले तसेच शिवाजी महाराजांची बदनामी केली. या घटनेचा निषेध करत वैचारिक मार्गाने निषेध नोंदवण्यासाठी हा सामूहिक वाचन उपक्रम आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमात पुस्तकातील निवडक प्रकरणांचे वाचन करण्यात येणार आहे. सोमवार, दिनांक २७ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी ०६:०० वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौक, अकोले येथे आयोजित या कार्यक्रमास अकोले तालुक्यातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

### घरात घुसून १ लाख ४० हजार रु किमतीचे सोने दागिने चोरी

शिवनेरी (स. गांवकरी) : दत्तात्रय विठ्ठल महाबरे रा. पाबळवाडी ,सावरगाव यांच्या शेतातील बंगल्यात अनोळखी चोरट्याने घरामध्ये घुसून १ लाख ४० हजार रुपये किमतीची सोने दागिने यांची चोरी केली . यामुळे परिसरात घाबराटीचे व भीतीचे वातावरण पसरले आहे. याबाबत सविस्तर माहिती अशी की , फिर्यादी कल्पना बाजीराव राजगुरू वय ६२ वर्ष यांच्या तोंडावर मारून गळ्यातील सोन्याचे मनी व पेंडल असलेली पोत व तुळशीची माळ हिसकावून घेऊन अनोळखी चोरटा पळून गेला आहे . या घरामध्ये उपविभागीय पोलीस अधिकारी धनंजय पाटील यांनी परिसराची व घराची पाहणी तसेच तपासणी केली आहे . अनोळखी चोरट्यावर रजिस्टर नंबर ११०/२०२६ भारतीय न्याय संहिता २०२३ चे ३०९ (६) प्रमाणे गुन्हा दाखल करून बि एन एस एस १२६ प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात येईल. या घटनेचा तपास पोलीस निरीक्षक किरण अवचर यांच्या मार्गदर्शनाखाली पो .स .ई तिटमे पुढील तपास करीत आहेत.

### स्वच्छ सर्वेक्षण 2025-26 साठी ठाणे महानगरपालिका सज्ज

ठाणे (स. गांवकरी) : स्वच्छ भारत मिशन अंतर्गत देशातील सर्व शहरांच्या स्वच्छतेचे मूल्यांकन स्वच्छ सर्वेक्षण 2025-26 द्वारे केले जाणार आहे. या अभियानातंर्गत शहराच्या स्वच्छतेचे मूल्यांकन हे प्रत्यक्ष पाहणी करुन व नागरिकांच्या अभिप्रायावर केले जाणार असून यासाठी केंद्र शासनाची समिती महापालिका राबवित असलेल्या उपक्रमाची पाहणी करणार आहे. या पार्श्वभूमीवर महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी शुक्रवारी (24 एप्रिल) ठाणे शहरातील विविध भागांची पाहणी करुन आवश्यक त्या सुधारणा करण्याचे निर्देश संबंधित विभागांना दिले. स्वच्छ सर्वेक्षण 2025-26 हे अभियान संपूर्ण महाराष्ट्रात 27 एप्रिल 2026 पासून सुरू होणार आहे. तर भारतामध्ये याची सुरूवात 25 एप्रिलपासून झाली आहे. या पार्श्वभूमीवर आयुक्त सौरभ राव राव, अतिरिक्त आयुक्त 1 संदीप माळवी, अतिरिक्त आयुक्त 2 प्रशांत रोडे, मुख्य पर्यावरण अधिकारी मनिषा प्रधान, उपायुक्त मधुकर बोडके, मिताली संचेती, उपनगरअभियंता विकास ढोले, सुधीर गायकवाड, शुभांगी केसवाणी आदी विविध विभागांच्या अधिकाऱ्यांसमवेत आयुक्तांनी पाहणी केली.

# रमाकांत डेरे यांच्या प्रकल्पांना परदेशी अभ्यासाकांची भेट

राजूर : (स. गांवकरी)

नेदरलँड येथून आलेली हॅना ब्रदर वैगनिंगन आणि हैदराबाद मधून आलेले तारकराम यांनी नुकतीच ज्येष्ठ पर्यावरण तज्ञ रमाकांत डेरे यांच्या राजूर येथील गारगोटी संग्रहालय तसेच जुन्या काळातील नाणी व पोस्टाची तिकिटे तसेच निसर्गातील विविध आकार असलेल्या लाकडांच्या प्रदर्शन दालनाला भेट दिली. दगडांचा देव म्हणून प्रसिद्ध असलेल्या तसेच चंदन लागवडीला राजआश्रय मिळवून देणारे ज्येष्ठ शेती तज्ञ रमाकांत डेरे गेली पाच ते सहा दशके विविध क्षेत्रात आपली सेवा देत आहेत. शेतकऱ्यांचे व आदिवासी बांधवांचे प्रश्न सोडवण्यासाठी सदैव तत्पर



असलेले रमाकांत डेरे यांच्याकडे विविध क्षेत्रातील मान्यवर भेटी देत असतात. त्यांचे सावरकुटे या आदिवासीबहुल गावातील फळबाग लागवडीचा प्रयोग देशभर गाजलेला आहे. नैसर्गिक स्त्रोतांचा योग्य वापर करून जीवनमान उंचावण्यासाठी फळबाग लागवडीतून स्थायी रोजगार निर्माण करण्यासाठी त्यांनी उभे केलेले मॉडेल सर्वांना प्रेरणा देणारे आहे. चंदन शेतीच्या माध्यमाने हजारो शेतकऱ्यांना मार्गदर्शन करून पर्यावरण पूरक शेतीचा मार्ग त्यांनी दाखवला आहे. चंदनाला शेती प्रकारामध्ये समाविष्ट करण्यासाठी शासन दरबारी त्यांनी केलेला सत्याग्रह सर्वांना माहीत आहे. खाजगी मालकीच्या जमिनीत चंदन लागवड करून त्याची नोंद सातबारावर घेता येते हे केवळ रमाकांत डेरे यांच्या प्रयत्नातून शक्य झाले.

रमाकांत डेरे यांचे जगभर मित्र परिवार विस्तारलेला आहे. या मित्रांच्या माध्यमातून जमा केलेले विविध देशातील पोस्टाची तिकिटे, चलनात असलेली व नसलेली विविध आकाराची नाणी , निसर्गात सापडलेले विविध आकारांचे दगड व गारगोटी, जंगलातील लाकडांचे विविध प्रकार व आकार , सागापासून बनवलेले भव्य दिव्य फर्निचर , जुन्या काळातील पुस्तके व नियतकालिके यांचा मोठा संग्रह त्यांच्या राजूर येथील दालनात बघायला भेटतो . बहुआयामी व्यक्तिमत्व म्हणून डेरे यांचा सर्वांना परिचय आहे. त्यांच्या कार्याची दखल घेत नेदरलँड येथून आलेली हॅना ब्रदर वैगनिंगन यांनी त्यांची राजूर येथे प्रत्यक्ष भेट घेऊन त्यांचे विविध प्रयोग समजावून घेतले.

समाजाप्रती असलेले त्यांचे विचार व कार्य सुमारे तीन तास वेळ देऊन जवळून बघितले. या भेटीचा मुख्य उद्देश ग्रामीण आणि भारतीय संस्कृतीचा अभ्यास करणे व येथील जीवनचरित्रार्थ कशाप्रकारे चालतो, शेती आणि शेतीपूरक व्यवसाय , ग्रामीण आणि आदिवासी संस्कृती, या सर्व बाबींचा अभ्यास त्यांनी जवळून केला. या भेटीदरम्यान भारत देशातील अनेक आठवणी सोबत घेऊन जात आहे असे गौरवोद्गार त्यांनी यावेळेस काढले.

## मालवाहू ट्रक व मोटरसायकलचा भीषण अपघात

संगमनेर खुर्द : (स. गांवकरी)

संगमनेर औद्योगिक वसाहती लगत असलेल्या वेल्हाळे गावाच्या शिवारातील संगमनेर नाशिक महामार्गावर मालवाहू ट्रक व मोटरसायकलच्या अपघातात 28 वर्षीय युवकाचा जागीच मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. गुरुवार दि. 23 रोजी अकोले तालुक्यातील डोंगरगाव येथील दिगंबर (बापू )रामदास उगले (वय 28 ) हे संगमनेर येथील टाटा मोटर्स या ठिकाणी कामावरून घरी जात असताना संध्याकाळच्या 7:45 च्या सुमारास नाशिक वरून येणाऱ्या ट्रक क्रमांक एम एच 17 सी व्ही. 5131 या लेलंड ट्रक ने दिगंबर उगले यांच्या हिरो होंडा क्रमांक एम एच 15,ए आर 52 40 स्प्लेंडर गाडीला जोराची धडक बसल्याने ट्रकच्या ड्रायव्हर साईटच्या बाजूने जोराची धडक बसल्याने दिगंबर रामदास उगले हे डोक्याला मार लागून गंभीर जखमी झाले. ट्रक व मोटरसायकलचा भीषण



अपघातात मोठा आवाज झाल्याने परिसरातील नागरिक या ठिकाणी धाव होऊन तातडीने संगमनेर शहर पोलीस स्टेशनला कळवण्यात आले व जखमी दिगंबर उगले यांना घुलेवाडी येथील प्राथमिक ग्रामीण आरोग्य केंद्रात पाठवण्यात आले. परंतु डॉक्टरांनी जखमी दिगंबर उगले त्यांना मृत घोषित करून संगमनेर शहर पोलीस स्टेशनला कळविण्यात आले. रात्री उशिरा ट्रकचालक व मालकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नाशिक पुणे महामार्गावर संगमनेर शहरा नजीक असलेल्या औद्योगिक वसाहती जवळ महा मार्गाच्या कामामुळे एकेरी वाहतूक चालू असून, या ठिकाणी कायम अपघात होत झाल्याची भावना येथेल नागरिकांनी चिंता व्यक्त केली आहे.

## संस्कार शिबीर; मनोरंजनातून संस्कारांची रुजवणूक

श्रीगोंदा : (स. गांवकरी)

शारदा मूल्यशिक्षणांकित संस्कार शिबीराचे प्रमुख मार्गदर्शक ह.भ.प. गुरुवर्य भूषण महाराज असून, या शिबिरामध्ये मनोरंजनातून शिक्षण व संस्कारांची रुजवणूक, अध्यात्मिक व मानसिक विकास, तसेच शिस्त व आत्मविश्वास वाढविण्यावर विशेष भर दिला जाणार आहे. सकाळी ९ ते सायंकाळी ५ या वेळेत चालणाऱ्या या शिबिराच्या प्रथम सत्रात सकाळी ९ ते १०.१५ या वेळेत योग व ध्यान (मेडिटेशन) घेण्यात येईल. त्यानंतर १०.१५ ते ११ या वेळेत छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा जोतीबा फुले, लोकमान्य टिळक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, क्रांतिवीर, स्व. मुरलीधर आण्णा होनराव, संत गाडगेबाबा, स्वामी विवेकानंद, लोकशाहीर डॉ. आणाभाऊ साठे, डॉ. ए.पी. जे. अब्दुल कलाम, अनाथांची माय सिंधुताई सपकाळ, धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज, कर्मवीर भाऊराव पाटील, राजर्षी शाहू महाराज



आणि महामानव बाबा आमटे आदी समाजसुधारकांच्या जीवनचरित्रावर मान्यवरांचे मार्गदर्शन होणार आहे.

दुपारी ११.३० ते १२.१५ या वेळेत दैनिक संस्कार वर्ग घेतले जातील. द्वितीय सत्रात दुपारी १२.१५ ते २.३० या वेळेत भोजन व विश्रांती असेल. त्यानंतर २.३० ते ४ या वेळेत विविध खेळ, मृदुंग रियाज, वारकरी पावली, फुगडी व हरिपाठाचे आयोजन करण्यात आले आहे.

दररोज सायंकाळी ४ ते ५ या वेळेत संत चरित्रावर आधारित व्याख्याने आयोजित करण्यात आली असून, संत एकनाथ महाराज, संत नामदेव महाराज, संत गोरोबा काका, संत सावता महाराज, संत मुक्ताबाई, संत तुकाराम महाराज, संत ज्ञानेश्वर महाराज, संत कानोपात्रा, तसेच आध्यात्म, आरोग्य आणि ‘आई’ या विषयांवर मार्गदर्शन केले जाणार आहे. शिबिराची सांगता दि. १५ मे २०२६ रोजी सायंकाळी ४ ते ६ या वेळेत होणार असून, यावेळी ह.भ.प. हरिदासजी पाल महाराज शास्त्रीजी (आळंदी देवाची) यांचे ‘२१ व्या शतकातील तरुण’ या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. या संस्कार शिबिराचा लाभ घेण्यासाठी इच्छुकांनी ह.भ.प. विठ्ठल महाराज खेडकर (मो. नं. ७०५८३६२१७८) यांच्याकडे नावनोंदणी करावी, असे आवाहन संस्थेचे अध्यक्ष प्रा. दीपक होनराव, उपाध्यक्ष एकनाथ आळेकर व सचिव डॉ. अशोक खेडके यांनी केले आहे.

## कन्या विद्यालयाचे यश; १५ विद्यार्थिनी शिष्यवृत्तीधारक

श्रीगोंदा : (स. गांवकरी)

नुकत्याच जाहीर झालेल्या राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती (एनएमएमएस) परीक्षेत श्रीगोंदा येथील श्रीमंत राजमाता विजयाराजे शिंदे कन्या विद्यालयाने उल्लेखनीय यश संपादन करत गुणवत्तेची परंपरा कायम राखली आहे. विद्यालयातील तब्बल 15 विद्यार्थिनी शिष्यवृत्तीधारक ठरल्या आहेत. यशस्वी विद्यार्थिनींचा सत्कार जनरल बॉडी सदस्य मा. कुंडलिकराव दरेकर, श्री. मिलिंद दरेकर, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे जिल्हा सचिव पीटर रणसिंग, नगरसेविका दिपाली बोरुडे व प्रा. उषा बोरुडे यांच्या हस्ते करण्यात आला. या विद्यार्थिनींना दरवर्षी 12 हजार रुपये प्रमाणे चार वर्षांत एकूण 48 हजार रुपयांची शिष्यवृत्ती मिळणार आहे.

या परीक्षेसाठी विद्यालयातील 140 विद्यार्थिनी बसल्या होत्या. त्यापैकी 109 विद्यार्थिनी उत्तीर्ण झाल्या असून विद्यालयाचा निकाल 78 टक्के लागला आहे. यामध्ये 50



विद्यार्थिनींनी 100 पेक्षा अधिक गुण मिळवले आहेत.

कु. मयुरी लहू गांगर्डे हिने 156 गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. तसेच देविकर आचल निलेश (150), सप्रे नीता नितीन (148), राऊत तनिष्का संदीप (146), वांगणे स्पंदन विजय (144), राऊत क्रांती राजेंद्र (141), टकले समीक्षा संतोष (140), कविटकर चिन्मयी संदीप (140), खोत प्राची महेश (139), शेळके संस्कृती अनिल (138), खेडकर नेहा ज्ञानदेव (137), खेंडके चिरंजीता प्रवीण (135), शिंदे सायली आबासाहेब (129), काळेवाघ आर्या राहुलकुमार (124) व कांगुणे पूर्वा अर्जुन (87) यांनी यश मिळवले. या विद्यार्थिनींना विभागप्रमुख मिलिंद काळे व विषय शिक्षक कुंदन खामकर, सोनाली कळसकर आणि ज्ञानदेव पोळ यांचे मार्गदर्शन लाभले. यशस्वी विद्यार्थिनींचे मुख्याध्यापिका वर्षा भोईटे, पर्यवेक्षक बाळासाहेब शिंदे आणि गुरुकुल प्रमुख किरण शिंदे यांनी अभिनंदन केले आहे.

गेल्या अनेक वर्षांपासून एनएमएमएस परीक्षेत रयत शिक्षण संस्थेच्या उत्तर विभागात अग्रस्थानी राहण्याची परंपरा या विद्यालयाने यंदाही कायम राखली असून परिसरातून विद्यार्थिनींचे कौतुक होत आहे.

## अध्यक्षपदी डॉ. प्रतिक गायकवाड यांची निवड

नारायणगाव : (स. गांवकरी)

आंबेगाव तालुका मेडिकल प्रॅक्टिशनर्स असोसिएशनच्या वतीने कार्यकारणीचा पदग्रहण सोहळा आयोजित करण्यात आला आहे. नव्या कार्यकारणीच्या अध्यक्षपदी डॉ. प्रतिक गायकवाड यांची निवड करण्यात आली आहे .तर उपाध्यक्षपदी डॉ. पूनम दहितुले यांची निवड करण्यात आली आहे. पदग्रहण सोहळ्याच्या अध्यक्षपदी डॉ. पंजाबराव कथे,डॉ.स्वप्नील चौधरी, डॉ. अमोल बेनके, डॉ. अमृत पेरणे, डॉ. पवन वैरागर, डॉ. प्रशांत काचळे, डॉ. पौर्णिमा कहाणे ,डॉ सुनील खिंवसरा ,डॉ. सुहास कहडणे, डॉ. वर्षाराणी गाडे उपस्थित



राहणार आहेत. डॉ.प्रतिक गायकवाड यांचे मंचर येथे विघ्नहर्ता नावाने गेली 10 वर्ष हॉस्पिटल कार्यरत आहे. या माध्यमातून त्यांनी अनेक सामाजिक उपक्रम राबविले. समाज प्रबोधन ,रक्तदान शिबिरे, वृक्षारोपण याद्वारे अनेकांना त्याचा लाभ झाला आहे. याशिवाय प्रत्येक वर्षी आळंदी ,पंढरपूर वारी करणाऱ्या वारकऱ्यांसाठी मोफत वैद्यकीय शिबीर आयोजित करून वारकऱ्यांची सेवा केली आहे .भिमाशंकर मेडिकल कॉलेज मंचर येथे असो. प्रोफेसर विभाग प्रमुख म्हणून कार्यरत आहेत. आजोबा वैकूंटवासी ह .भ .प निवृत्ती महाराज गायकवाड व वडील प्राचार्य डॉ. पांडुरंग गायकवाड यांचा वारकरी संप्रदायाचा व समाजसेवेचा समृद्ध वारसा लाभला आहे.

# महसूल विभागाचे जुने कायदे बदलून प्रशासन लोकाभिमुख करणार

## महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे : महसूलमंत्र्यांनी शिर्डीत घेतला जनता दरबार

शिर्डी : (स. गांवकरी)

राज्याचे महसूल खाते हे नागरिकांच्या मालमत्तेचे रक्षण करते. त्यामुळे जुन्या महसूल कायद्यांमधील क्लिष्ट प्रक्रिया कमी करून सर्वसामान्यांना जलद न्याय देण्यासाठी कायदे बदलण्यात येत आहेत, असे प्रतिपादन महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले.

नागरिकांच्या समस्या ऐकून त्यांची थेट सोडवणूक करण्यासाठी शिर्डी अपर जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित जनता दरबारात ते बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, अपर जिल्हाधिकारी बाळासाहेब कोळेकर, शैलेश हिंगे, अपर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाकचौरे, निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गिते, शिर्डी उपविभागीय अधिकारी माणिक आहेर, माजी आमदार स्नेहलता कोल्हे आदी उपस्थित होते.

महसूलमंत्री श्री. बावनकुळे



म्हणाले, शेतीच्या रस्त्यांचे वाद मिटवण्यासाठी पुढील पाच वर्षांत सर्व पाणंद रस्ते बारमाही केले जातील व त्यांच्या कडेला वृक्षलागवड केली जाईल. सातबारा उताऱ्यावरील मृत व्यक्तींचे नाव कमी करण्यासाठी नागरिकांना हेलपाटे मारावे लागू नयेत, यासाठी तहसीलदारांनी स्वतःहून ही दुरुस्ती करावी. जमिनीच्या मोजणीसाठी लागणारा वेळ कमी करण्यासाठी खासगी मोजणीदार नेमून ड्रोनच्या साहाय्याने केवळ पंधरा दिवसांत मोजणी पूर्ण करण्याचे उद्दिष्ट असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले. गोरगरिबांना हक्काचे घर मिळावे यासाठी शासनाने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. यानुसार २०११ पूर्वी गायरान व सरकारी जागेवर बांधलेली निवासी घरे नियमित केली जाणार आहेत. या निर्णयामुळे भटके विमुक्त, पारधी समाजासह अनेक गरिबांना मोठा आधार मिळेल. केवळ एक हजार रुपये शुल्क आकारून ग्रामपंचायतीच्या दप्तरात या घरांची नोंदणी करून मालकी हक्क दिला जाईल, असेही श्री. बावनकुळे यांनी सांगितले. महसूल विभागातील प्रलंबित प्रकरणांबाबत त्यांनी अधिकाऱ्यांना सूचना दिल्या. अधिकाऱ्यांनी त्यांच्याच स्तरावर नागरिकांचे प्रश्न सोडवले तर लोकांना मंत्रालयात येण्याची वेळ येणार नाही. महसुली प्रकरणांच्या सुनावणीत तारखांवर तारखा न देता केवळ दोन तारखांमध्ये निर्णय घेण्याचे आदेश त्यांनी दिले आहेत. दुसऱ्या तारखेला लेखी युक्तिवाद न आल्यास एकतर्फी आदेश काढले जातील, असे त्यांनी सांगितले.

नागरिकांची कामे वेळेत व्हावीत यासाठी प्रशासन कटिबद्ध आहे. अधिकाऱ्यांकडे जाऊनही काम पूर्ण न झाल्यास नागरिकांनी माझ्या व्हॉट्सॲप क्रमांकावर स्वतःचे नाव व कामाचा तपशील पाठवावा, असे आवाहन त्यांनी केले. जिल्हाधिकारी डॉ. आशिया म्हणाले, नागरिकांचे सर्व प्रश्न सोडवण्यासाठी जिल्हा प्रशासन कटिबद्ध आहे.

अकृषिक परवानगी, वाळू धोरण, शेतरस्ते व तुकडेबंदी कायद्याबाबत शासनाने घेतलेल्या लोकोपयोगी निर्णयांची प्रभावी अंमलबजावणी जिल्ह्यात केली जात आहे.

राज्याच्या व देशाच्या आर्थिक प्रगतीत महसूल तसेच भूमी अभिलेख विभागाचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे, असेही जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले. वर्ष २०४७ पर्यंत देशाला 'विकसित राष्ट्र' बनवण्याच्या ध्येयपूर्तीसाठी शासकीय यंत्रणा काम करत आहे. या संकल्पासाठी गाव पातळीवरील कोतवाल, तलाठी ते वरिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत सर्वजण प्रयत्नशील आहेत. नागरिकांच्या अडीअडचणी शक्यतो जिल्हा पातळीवरच सोडवल्या जातील व आवश्यकतेनुसार कायद्यात किंवा शासन निर्णयात बदल करण्यासाठी शासनाकडे पाठपुरावा केला जाईल, असेही त्यांनी सांगितले.

प्रास्ताविकात श्री. कोळेकर यांनी महसूल विभागाची अकृषिक परवानगी कायद्यातून रद्द करणे, घरांसाठीची तुकडे खरेदी विना-नजराणा नियमानुकूल करणे, ५०० रुपयांच्या स्टॅम्पवर कौटुंबिक वाटपपत्राची नोंदणी करणे, सातबारा उताऱ्यावरील कालबाह्य नोंदी वगळणे व 'बळीराजा शेत पाणंद योजने'तून कृषी विकासाला चालना देणारे धोरण या ऐतिहासिक निर्णयांबद्दल माहिती दिली.

यावेळी महसूलमंत्र्यांनी दोनशेहून अधिक नागरिकांची निवेदने प्रत्यक्ष स्वीकारली. यातील काही निवेदनांवर जागेवरच निर्णय दिला, तर काही निवेदनांचा पंधरा दिवसांच्या आत निपटारा करण्याची ग्वाही दिली. याप्रसंगी महसूलमंत्र्यांच्या हस्ते महसुली सेवांचा लाभ घेतलेल्या लाभार्थ्यांना प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले.

# थोडक्यात पण महत्वाचे



## तज्ञ संचालकपदी उदयसिंह पाटील, शिवाजी हांगे यांची निवड

इंदापूर(स. गांवकरी) : शहाजीनगर (ता.इंदापूर) येथील निरा भिमा सहकारी साखर कारखान्याच्या तज्ञ संचालकपदी निवडीबद्दल उदयसिंह विलासराव पाटील व शिवाजी सादबा हांगे यांचा कारखान्याचे संस्थापक, राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघ नवी दिल्लीचे अध्यक्ष, माजी मंत्री हर्षवर्धन पाटील व कारखान्याच्या अध्यक्षा सौ.भागश्री पाटील यांच्या हस्ते संचालक मंडळाच्या बैठकीमध्ये शुक्रवारी (दि. 25) सत्कार करण्यात आला. नूतन तज्ञ संचालक उदयसिंह पाटील हे दूधगंगा दूध संघाचे माजी अध्यक्ष असून यापूर्वी निरा भिमा कारखान्याचे संचालक म्हणूनही त्यांनी काम केलेले आहे. तर शिवाजी हांगे हे भोडणी गावचे अनेक वर्ष सरपंच होते तसेच त्यांनी नीरा भीमा कारखान्याचे संचालक म्हणूनही काम केलेले आहे. या सत्कार प्रसंगी उपाध्यक्ष दादासाहेब घोगरे, लालासाहेब पवार, विलासराव वाघमोडे, अँड.कृष्णाजी यादव, दत्तू सवासे, प्रतापराव पाटील, प्रकाश मोहिते, संजय बोडके, राजकुमार जाधव, विजय घोगरे, सुभाष गायकवाड, राजेंद्र देवकर, उमेश पाटील, महेशकुमार शिर्के, आनंदराव बोंद्रे, रामचंद्र नाईक, राहुल कांबळे, संगिता पोळ, कल्पना शिंदे, कार्यकारी संचालक नवनाथ सपकाळ उपस्थित होते.



## एस पी बघेल यांना छत्रपती संभाजी महाराज राष्ट्रीय जयंतीचे निमंत्रण

आग्रा (उत्तर प्रदेश) (स. गांवकरी) : छावा भारत क्रांती मिशन आयोजित धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांची १४ में रोजी जयंती ऐतिहासिक स्थळ असलेल्या आग्रा (उत्तर प्रदेश) येथे साजरी करण्यात येणार आहे. नाशिक येथून धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांचा १३ फूट असलेल्या अश्वरूढ पुतळा सह शेकडो शिवशंभू भक्त वाहना द्वारे सहभागी होत. राष्ट्रीय गौरव यात्रा नाशिक , जयपूर राजस्थान मार्गे आग्रा येथे पोहचेल. आग्रा या ठिकाणी जयंती उत्सव साजरा करण्यात येणार आहे. या पार्श्वभूमीवर छावा भारत क्रांती मिशन राष्ट्रीय अध्यक्ष डॉ विलासभाऊ पांगारकर, संघटक परमेश्वर नलावडे पाटील, राजस्थान येथील समन्वयक शशिकांत पवार, मिडिया समन्वयक अमोल सोनवणे, अतुल पांगारकर, योगेश शिंदे आदींनी केंद्रीय राजस्व व पंचायतराज राज्यमंत्री एस पी बघेल यांची भेट घेत जयंतीचे आमंत्रण देत कार्यक्रमाची माहिती देत चर्चा केली. यावेळी येथील भाजप जिल्हाध्यक्ष प्रशांत पौनिया , महानगर प्रमुख राजकुमार गुप्ता यांना देखील निमंत्रण देण्यात आले. आग्रा येथे असलेल्या मराठी बांधावाची भेट घेण्यात आली. आग्रा येथील लाल किल्ला, येथील छत्रपती शिवाजी महाराज यांचे स्मारक येथे भेट देत. येथील पोलीस प्रशासना सोबत चर्चा करत पाहणी देखील करण्यात आली.

## गर्भाशयाच्या मुखाचा कर्करोग टाळण्यासाठी लसीकरण करून घ्यावे



बिलोली (स. गांवकरी) : १४ते१५ वयोगटातील मुलींनी आणि पात्र महिलांनी गर्भाशयाच्या मुखाचा कर्करोग टाळण्यासाठी अत्यंत प्रभावी असलेली एचपीव्ही लसीकरण करून घ्यावे असे आवाहन बिलोली उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ योगेश राजपूत यांनी केले आहे. गर्भाशयाचा कर्करोग हा भारतात स्त्रियांमध्ये आढळणारा नंबर दोनचा कर्करोग आहे व मृत्यूचे कारण आहे.जागतिक आरोग्य संघटनेने त्यांच्या लसीकरण मोहीमेत एचपीव्ही लसीकरणाला प्रमुख स्थान दिले आहे.ही लस १४ते १५ वयोगटातील मुलींना देता येते. या लसीकरणामुळे गर्भाशयाच्या मुखाचा कर्करोग तसेच चामखीळ व मसा यापासून संरक्षण होते. या लसीने वंध्यत्व किंवा मेंदूचे आजार होतात अशा प्रकारच्या व्हिडिओ क्लिप्स समाजमाध्यातून व्हायरल झाल्या, यापुढेही होतील पण त्यातील माहिती संपुर्णतः चुकीची व निराधार आहे हे मी ठामपणे सांगू शकतो.विशेष म्हणजे माझी मुलगी कु.राशी राजपूत हिचे आम्ही लसीकरण केले आहे.ही लस मोफत असून ती आपल्या रुग्णालयात उपलब्ध आहे तेव्हा पालकांनी मनात कसलेच गैरसमज न बाळगता मुलीला भविष्यात गर्भाशयाच्या मुखाचा सामना करावा लागू नये यासाठी आजच पालकांनी सजग होत मुलींचे एचपीव्ही लसीकरण करून घ्यावे असे आवाहन डॉ योगेश राजपूत यांनी केले.

## महेंद्र कोसरे या कंत्राटी कर्मचाऱ्यावर कारवाईची मागणी

नांदेड जिल्हा (स. गांवकरी) : जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, नांदेड येथे कार्यरत असलेले कंत्राटी प्रकल्प सहाय्यक महेंद्र कोसरे यांच्याकडून पदाचा आणि मंत्र्यांच्या नावाचा गैरवापर होत असल्याचा गंभीर आरोप निवेदना द्वारे करण्यात आला आहे. सामाजिक कार्यकर्त्या श्रीमती शितल अनिल भवरे यांनी याप्रकरणी समाज कल्याण आयुक्तांकडे तक्रार करत कोसरे यांच्या सेवा समाप्तीची मागणी केली आहे. निवेदनानुसार, महेंद्र कोसरे हे सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे मंत्री ना. संजय सिरसाट यांच्या आपण जवळचे नातेवाईक असल्याचे सांगून कार्यालयात दहशत निर्माण करत आहेत. वरिष्ठांवर दबाव टाकणे, अधिकारी व कर्मचाऱ्यांना धमकावणे आणि "माझ्या मर्जीप्रमाणे काम झाले नाही तर महागात पडेल" अशा स्वरूपाच्या धमक्या ते देत असल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. महिलांसोबत गैरवर्तन आणि विनयभंगाचे आरोप केवळ प्रशासकीय दबावच नाही, तर कोसरे यांच्या वर्तणुकीवरही गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले आहेत. कार्यालयात येणाऱ्या विद्यार्थी, पालक आणि विशेषत महिलांशी हुज्जत घालणे वाद विवाद करणे त्यांच्याशी अपशब्द वापरणे, महिलांशी जवळीकता साधण्याचा प्रयत्न करणे असे गैरप्रकार त्यांच्याकडून घडत असल्याचे निवेदनात म्हटले आहे. अशा वर्तणुकीमुळे कार्यालयाची प्रतिमा मलिन होत असून समितीच्या पारदर्शकतेवरही प्रश्न चिन्ह निर्माण केला जात आहे. देण्यात आला आहे या प्रकरणी प्रशासनाने गांभीर्याने दखल घेऊन महेंद्र कोसरे यांची सेवा समाप्ती तात्काळ करावी, अशी मागणी श्रीमती भवरे यांनी केली आहे. जर १ मे पूर्वी प्रशासनाने योग्य ती कारवाई करावी अन्यथा दि १ मे २०२६ रोजी पुणे येथील बार्टी (BARTI) महासंचालकांच्या कार्यालयासमोर बेमुदत आमरण उपोषण करण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे. या निवेदनाच्या प्रती मुख्यमंत्री, सामाजिक न्याय मंत्री , जिल्हाधिकारी नांदेड आणि इतर संबंधित विभागांना माहितीसाठी पाठवण्यात आल्या आहेत.

# स्थानिक गुन्हे शाखेची मोठी कारवाई; तिघांना ठोकल्या बेड्या !

### ४६ लाख रूपयांचा मुद्देमाल हस्तगत




नारायणगाव : (स. गांवकरी)

जबरी चोरी, चेन स्नाचिंग, घरफोडी करून चोऱ्या करणाऱ्या सराइत टोळ्यांतील ३ जणांना जेरबंद करून २३ गुन्हे उघडकीस आणून गुन्ह्यात चोरीला गेलेले सुमारे ३२ तोळे सोन्याचे दागिने व इतर मुद्देमाल असा सुमारे ४६ लाख रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला, अशी माहिती पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षक संदीप सिंह गिल्ल यांनी दिली.

हर्षल दत्तात्रय तांदळे (वय २५ रा. भीमाशंकर सोसायटी, मंचर, ता. आंबेगाव, जि. पुणे) व महेश दत्तात्रय मंगळवेढेकर (वय २५, रा. मुळेवाडी रोड, मंचर, ता. आंबेगाव जि.पुणे), पियुष बिरम नानावत (वय १९ रा. सांगेशी कामशेत, ता. मावळ, जि. पुणे) अशी अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत.

पुणे ग्रामीण जिल्ह्यात २०२५-२६ मधील दाखल जबरी चोरी, चेन स्नॅचिंग, घरफोडी, चोरीच्या गुन्ह्यांचा तपास करण्याचे आदेश स्थानिक

गुन्हे शाखेच्या पथकांना दिले असता विविध ठिकाणी केलेल्या तपासात आरोपींची माहिती मिळाली. नारायणगाव व मंचर पोलीस स्टेशनच्या रेकॉर्डवरील हर्षल तांदळे व महेश मंगळवेढेकर यांचा काही गुन्ह्यात सहभाग असल्याची माहिती बातमीदाराकडून मिळाली. त्यानुसार पथकाने खात्री करून हर्षल तांदळे, महेश मंगळवेढेकर यांना आंबेगाव तालुक्यातील पोंदेवाडी फाटा परिसरातून ताब्यात घेतले. त्यांच्याकडे चौकशी केली असता त्यांनी नारायणगाव, पारगाव,घोडेगाव, जुन्नर आळेफाटा परिसरात गुन्हे केले असून त्यांचेकडून गुन्ह्यांत चोरी केलेल्या मुद्देमालापैकी २० तोळे वजनाचे सोन्याचे दागिने, एक पल्सर मोटार सायकल, दोन बंब असा सुमारे २९ लाखांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. तसेच रेकॉर्डवरील संशयित पियुष नानावत यानेही साथीदारांच्या मदतीने अनेक गुन्हे केले आहेत. तो काही महिन्यापूर्वीच बालसुधारगृहातून बाहेर आला असून त्याने त्याचे इतर दोन अल्पवयीन साथीदार यांच्या मदतीने उरुळीकांचन, शिरूर, दौंड, लोणावळा, वडगाव मावळ, राजगड, बारामती, भोर, जुन्नर, खेड, शिरूर, भोर, सासवड, वेल्हा, यवत या ठिकाणी गुन्हे केले असल्याचे तपासात निष्पन्न झाले. गुन्ह्यातील सुमारे १२ तोळे वजनाचे सोन्याचे दागिने, मोटारसायकल, असा एकूण १७ लाख रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. पियुष याच्यावर लोणावळा शहर, वडगाव मावळ, शिरगाव,परदवडी पोलीस स्टेशन येथे ४ गुन्हे दाखल आहेत. ही कामगिरी विशेष पोलीस महानिरीक्षक सुनील फुलारी, पोलीस अधीक्षक संदीप सिंह गिल्ल, अपर पोलीस अधीक्षक रमेश चोपडे, अपर पोलीस अधीक्षक गणेश बिरादार, उपविभागीय पोलीस अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक प्रमोद क्षीरसागर, पोलीस निरीक्षक शंकरराव पाटील, सचिन वांगडे, सुभाष चव्हाण, सचिन कांडगे, महादेव शेलार, राहुल गावडे, दत्ताजीराव मोहिते, अभिजीत सावंत, दिपक साबळे, संदिप वारे, अक्षय नवले, विक्रमसिंह तापकीर, हेमंत विरोळे, अतुल डेरे, राजु मोमीण, निलेश सुपेकर, तुषार भोईटे, सागर नामदास, अजित भुजबळ, सचिन घाडगे, धिरज जाधव, असिफ शेख, योगेश नागरगोजे, राहुल पवार, समाधान नाईकनवरे, नंदा कदम, सुजाता कदम, सचिन गिलबिले, भाऊसाहेब लोकरे, मंगेश अभंग, संजय साळवे यांनी केली आहे.

## अचूक जनगणनेसाठी सक्षम तयारी



किनवट : (स. गांवकरी)

भारत सरकारच्या महत्त्वपूर्ण उपक्रम असलेल्या जनगणना 2027 अनुषंगाने पर्यवेक्षक व प्रगणक यांचे तीन दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रम दिनांक 23 एप्रिल ते 25 एप्रिल 2026 या कालावधीत मातोश्री कमलाताई ठमके महाविद्यालय, कोठारी (किनवट) येथे यशस्वीरीत्या पार पडला. किनवट शहरातील जनगणना प्रक्रिया प्रभावीपणे राबविण्यासाठी विविध शाळा व महाविद्यालयांतील शिक्षकांची प्रगणक व पर्यवेक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. या प्रशिक्षणाच्या माध्यमातून संबंधितांना जनगणनेच्या कामकाजाबाबत सखोल मार्गदर्शन देण्यात आले. कार्यक्रमाचे मार्गदर्शन जनगणना 2027 चे चार्ज अधिकारी तथा नगरपरिषद किनवटचे मुख्याधिकारी मुगाजी काकडे यांनी केले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली फिल्ड ट्रेनरच्या पथकाने प्रशिक्षणार्थींना जनगणना प्रक्रियेचे सर्व टप्पे सविस्तर समजावून सांगितले. प्रशिक्षणादरम्यान घरगुती यादीकर, लोकसंख्या गणना तसेच प्रत्यक्ष सर्वेक्षण करताना घ्यावयाची काळजी, अचूक माहिती संकलनाचे महत्त्व आणि तांत्रिक बाबी यावर विशेष भर देण्यात आला.

## "पहिले पूल आणि रस्ता, मगच मतदान" : निवडणूक बहिष्कार

- प्रशासनाच्या निष्काळजीपणाविरोधात जनआक्रोश
- ८४८ मतदारांनी मतदानावर बहिष्कार



डांग, गुजरात : (स. गांवकरी)

पेटा : डांग जिल्ह्यातील कोटमदर गावात ग्रामस्थांनी मतदानाचा बहिष्कार टाकत प्रशासनाविरोधात तीव्र संताप व्यक्त केला. लोकशाहीचा उत्सव सुरू असताना डांग जिल्ह्यातील आहवा तालुक्यातील कोटमदर गावातून प्रशासनाला धक्का देणारी घटना समोर आली आहे. रस्ता आणि जीर्ण झालेल्या नाल्याच्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या समस्यांचे निराकरण करण्यात प्रशासन अपयशी ठरल्याने ग्रामस्थांनी संतप्त होऊन ठोस भूमिका घेतली. "रस्ता नाही तर मतदान नाही" या निर्धाराने गावातील सर्व ८४८ मतदारांनी एकमुखाने मतदानाचा बहिष्कार केला.

कोटमदर गावातील पूरग्रस्त नाला दरवर्षी पावसाळ्यात जीवघेणा ठरतो. ग्रामस्थांनी अनेक वेळा लेखी व तोंडी तक्रारी करूनही प्रशासनाने दुर्लक्ष केले. त्यामुळे संतप्त ग्रामस्थांनी लोकशाहीतील सर्वात मोठे हत्यार असलेला मतदानाचा अधिकारच न वापरता आपला रोष व्यक्त केला. कोटमदर प्राथमिक शाळेतील मतदान केंद्रावर दिवसभर शुकशुकाट दिसून आला. डांग जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक आणि मामलतदार यांच्यासह वरिष्ठ अधिकारी गावात दाखल झाले, तरीही ग्रामस्थांनी त्यांना प्रतिसाद दिला नाही. "पहिले पूल आणि रस्ता बांधा, मगच मत मागा," असा स्पष्ट इशारा ग्रामस्थांनी दिला. डांग जिल्ह्यातील सापुतारा परिसरातील जोगबारी गावातही खराब रस्त्याच्या मुद्द्यावरून ग्रामस्थ संतप्त झाले होते. येथेही बहिष्काराची परिस्थिती निर्माण झाली होती. मात्र, मालेगाव समूह ग्रामपंचायतीच्या युवा महिला सरपंच तन्मयबेन ठाकरे यांनी मध्यस्थी करत लोकशाहीचे महत्त्व पटवून दिले. त्यांच्या आश्वासनावर विश्वास ठेवत जोगबारीतील ग्रामस्थांनी मतदान केले, ज्यामुळे प्रशासनाला मोठा दिलासा मिळाला. कोटमदरची घटना प्रशासनासाठी चपराक मानली जात आहे. जेव्हा नागरिकांना मूलभूत सुविधांसाठी मतदानासारख्या प्रक्रियेचा त्याग करावा लागतो, तेव्हा कागदावरील विकासाच्या दाव्यांची पोकळता स्पष्ट होते. वेळेत उपाययोजना न केल्यास असे बहिष्कार आंदोलन इतर गावांमध्येही पसरू शकते.

## अशोका मेडिकव्हर हॉस्पिटलतर्फे वाहतूक पोलीस शेडचे उद्घाटन

### सामाजिक बांधिलकीचा उपक्रम




नाशिक : (स. गांवकरी)

अशोका मेडिकव्हर हॉस्पिटल, नाशिक यांच्या वतीने सामाजिक बांधिलकी जपत वाहतूक पोलिसांसाठी उभारण्यात आलेल्या विशेष ट्रॅफिक पोलीस शेडचे उद्घाटन उत्साहात पार पडले. या उपक्रमाचा मुख्य उद्देश शहरातील वाहतूक पोलिसांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देणे तसेच त्यांच्या आरोग्य व सुरक्षिततेची काळजी घेणे हा आहे.

या शेडचे उद्घाटन संयुक्त आयुक्त, वाहतूक विभाग मा. अद्विता शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी मुंबई नाका पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक (PI) श्री. विश्वास पाटील तसेच वाहतूक विभागाचे पत्की साहेब हे देखील उपस्थित होते. या कार्यक्रमाला वाहतूक पोलीस विभागातील अधिकारी, कर्मचारी तसेच अशोका मेडिकव्हर हॉस्पिटलचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या उपक्रमांतर्गत सध्या ४ ट्रॅफिक पोलीस शेड युनिट्स शहरातील विविध ठिकाणी उभारण्यात आले आहेत, ज्यामुळे अधिकाधिक वाहतूक पोलिसांना याचा लाभ मिळणार आहे. शहरातील वाढत्या वाहतुकीच्या पार्श्वभूमीवर वाहतूक पोलीस अत्यंत कठीण परिस्थितीत काम करतात. उन्हाचा तडाखा, वाढते प्रदूषण आणि बदलते वातावरण यांचा त्यांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होऊ शकतो. या पार्श्वभूमीवर उभारण्यात आलेले हे शेड वाहतूक पोलिसांसाठी आधारस्तंभ ठरणार असून, त्यांना उन्हापासून आणि प्रदूषणापासून संरक्षण मिळण्यास मदत होणार आहे. या उपक्रमाद्वारे "ट्रॅफिकची शिस्त" या सामाजिक संदेशालाही प्राधान्य देण्यात आले असून, नागरिकांमध्ये वाहतूक नियमांचे पालन करण्याबाबत जनजागृती करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. या प्रसंगी अशोका मेडिकव्हर हॉस्पिटलचे विविध तज्ज्ञ डॉक्टर उपस्थित होते. त्यामध्ये डॉ. संदीप सबनीस (GI सर्जन), डॉ. सागर काकतकर (ऑर्थोपेडिक सर्जन), डॉ. राहुल सुपे (ऑर्थोपेडिक सर्जन), डॉ. राकेश पाटील (MD मेडिसिन), डॉ. शेखर चिरमाडे (न्यूरो व स्पाइन सर्जन), डॉ. परेश अलवानी (MD मेडिसिन), डॉ. अखिलेश सोमानी (इमर्जन्सी मेडिसिन) आणि डॉ. हेमंत राज आहिरे (कार्डिओलॉजिस्ट) यांचा समावेश होता. यावेळी बोलताना अशोका मेडिकव्हर हॉस्पिटलचे केंद्र प्रमुख श्री. अनुप त्रिपाठी यांनी सांगितले की, "सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून हा उपक्रम राबविण्यात आला आहे. वाहतूक पोलिसांचे काम अत्यंत आव्हानात्मक आहे आणि त्यांच्या आरोग्याची व सुरक्षिततेची काळजी घेणे ही आपली जबाबदारी आहे. सध्या ४ युनिट्स उभारण्यात आली असून, येणाऱ्या काळात अशा आणखी उपक्रमांद्वारे आम्ही समाजासाठी अधिक योगदान देण्याचा प्रयत्न करू. तसेच, येणाऱ्या कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवरही अशा सुविधा अधिक व्यापक स्वरूपात उपलब्ध करून देण्याचा आमचा मानस आहे."



## माजी उपमहापौरांचा स्नेहमेळावा उत्साहात; गीतसादरीकरणाने रंगली मैफल

पुणे : (स. गांवकरी)

उपमहापौर परशुराम वाडेकर यांच्या पुढाकारातून आयोजित करण्यात आलेला माजी उपमहापौरांचा स्नेहमेळावा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. शहराच्या राजकीय आणि सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत हा मेळावा संस्मरणीय ठरला. या कार्यक्रमाला माजी उपमहापौर डॉ. सतीश देसाई, आबा बागुल, बंडू गायकवाड, दीपक मानकर, प्रकाश मंत्री, प्रसन्न जगताप, सुनीता वाडेकर यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच विरोधी पक्षनेते नीलेश निकम, माजी नगरसेवक दत्ता सागरे, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) शहराध्यक्ष संजय सोनवणे, पुणे महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त ओमप्रकाश दिवटे यांच्यासह अनेक मान्यवर आणि पत्रकारांनीही कार्यक्रमाला हजेरी लावली. स्नेहमेळाव्याच्या निमित्ताने सर्व माजी उपमहापौरांना एकत्र येऊन जुन्या आठवणींना उजाळा देण्याची संधी मिळाली. राजकारणातील अनुभव, शहराच्या विकासासाठी केलेले प्रयत्न आणि भविष्यातील दृष्टीकोन यावर अनौपचारिक चर्चा रंगली. वातावरण मैत्रीपूर्ण आणि आनंददायी होते. कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे माजी उपमहापौरांनी सादर केलेली गीते. परशुराम वाडेकर यांच्यासह उपस्थित मान्यवरांनी विविध मराठी व हिंदी गीते सादर करत आपल्या कलागुणांचे दर्शन घडवले. या संगीत मैफलीने उपस्थितांना मंत्रमुग्ध केले आणि कार्यक्रमाला वेगळेच रंगतदार स्वरूप प्राप्त झाले.

# देव देश धर्माकरता सदैव जागृत रहा : श्री भास्करगिरी

- वादळे येतील,पूर महापुरात सर्व वाहून जाईल मात्र अस्तित्व वाहू देऊ नका
- देवगड येथील गंगापूजन व किर्तन सोहळयात राष्ट्र संत गुरूवर्य बाबांचे आवाहन



नेवासा (स. गांवकरी)

नेवासा तालुक्यातील गुरूदेव दत्त पीठ असलेल्या श्री क्षेत्र देवगड येथे राष्ट्र संत गुरुवर्य श्री भास्करगिरीजी महाराजांच्या मातोश्री गुरूमाता श्रीमती सरूआई पाटील यांच्या चौदाव्या निमित्ताने आयोजित गंगापूजन व किर्तन सोहळयाला भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.देव देश धर्माकरता सदैव जागृत रहा,वादळे येतील,पूर महापुरात सर्व वाहून जाईल मात्र अस्तित्व वाहू देऊ नका असे आवाहन यावेळी झालेल्या किर्तन सोहळयाच्या प्रसंगी राष्ट्र संत गुरूवर्य श्री भास्करगिरी बाबांनी यावेळी बोलतांना केले. यावेळी झालेल्या चौदाव्या विधीच्या निमित्ताने कलशात आणण्यात आलेल्या देशभरातील अनेक गंगाजलाचे पूजन गुरुवर्य श्री भास्करगिरीजी बाबा,त्यांचे बंधू मधुकरबाबा पेसोडे पाटील,भगिनी कमलबाई रायपुरे व पेसोडे पाटील परिवारातील सदस्यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी झालेल्या उदक शांती व गंगापूजन कार्यक्रमाचे पौरोहित्य भेंडे येथील वेदशास्त्रसंपन्न गणेशदेवा कुलकर्णी,शरदगुरू काटकर,हेमंत देवा कुलकर्णी यांच्यासह ब्रम्हवृंद मंडळींनी केले.यावेळी येथील ज्ञानसागर किर्तन मंडपामध्ये हजारो भाविकांच्या उपस्थितीत गिरी आश्रमाचे महंत श्री कैलासगिरीजी महाराज यांचे आईवडील यांचा महिमा सांगणारे किर्तन झाले.

यावेळी झालेल्या किर्तन सोहळयात गुरुवर्य श्री भास्करगिरीजी बाबांनी आपले विचार व्यक्त केले ते म्हणाले की राष्ट्राची असलेली संस्कृती व प्रेम जतन करून आपापले काम करत राहण्याचा प्रयत्न झाला पाहिजे हे करतांना राष्ट्र समोर ठेवा,त्यासाठी निद्रेत व स्वप्नातही जागृत रहाण्याचा प्रयत्न करा,देव देश धर्माकरता सदैव जागृत रहा,वादळे येत राहतील,अधूनमधून गारपीट ही होत राहतील,पूर महापूर ही येत राहतील त्यात सर्व वाहून जाईल अस्तित्व वाहून जाऊ देऊ नका असे आवाहन त्यांनी केले. येणाऱ्या वावटळात कचरा उडत राहील त्याला झटकून द्या,कचरा उडवणारा देखील सुखात रहावा अशी प्रार्थना त्यांनी केली,आपल्याला कोनाविरुद्ध दंड थोपटायांचे नाहीतर त्यांचे दंड दाबायचे आहे,कारण दंड थोपटले तर एक दिवस तो फ्रॅक्चर होऊन जाईल असा संदेश देत आईवडीलांच्या सेवेमध्ये अंतर देऊ नका, आईवडीलांसमोर नियम शास्त्रे असेल तर ते बाजूला ठेवा,शेवटच्या श्वासापर्यंत आईवडीलांची सेवा करा असे आवाहन त्यांनी केले. आपला धर्म व देशातील माणुसकीमुळे भारतातील प्रत्येक पुरुष हा रामाचा अवतार असून आपल्या देशातील महिला ही सीतामाईचा अवतार आहे,रामाने आचार व नियम दिला तर सीता मातेने कर्तृत्व दिले अशी पाश्चात्य लोकांची धारणा आहे हीच धारणा आपल्यात रुजावी व प्रभू रामचंद्रांने निरहेतुकपणे हे कार्य करून घ्यावे अशी प्रार्थना त्यांनी यावेळी बोलतांना केली.यावेळी उपस्थित संत महंत मंडळींचे संतपूजन गुरुवर्य श्री भास्करगिरीजी बाबा व देवगड संस्थानचे उत्तराधिकारी स्वामी प्रकाशानंदगिरीजी बाबांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी झालेल्या किर्तन सोहळयाच्या प्रसंगी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून आलेले वारकरी संप्रदायातील संत महंत, कीर्तनकार,प्रवचनकार,भजनी मंडळाचे सेवेकरी,पंचक्रोशीतील पुरुष,युवक सेवेकरी, महिला भाविक उपस्थित होते.

उपस्थित हजारो भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.उपस्थित हजारो भाविकांना महाप्रसादाचे वाटप करून गंगापूजन व किर्तन सोहळयाची भक्तिमय वातावरणात सांगता करण्यात आली.

## थोडक्यात पण महत्वाचे



### २० शहरांतील तरुणाई उतरली रस्त्यावर

पुणे (स. गांवकरी) : भारतातील दूध व्यावसाय हा बीफ (गोमांस) निर्यातीला थेट बळ देतो, हे सांगत पुण्यातील तरुणाई आज रस्त्यावर उतरली. 'पृथ्वी दिना'चे औचित्य साधून प्राणी हक्क कार्यकर्ते आज रस्त्यावर उतरले. अन् जगातील सर्वात मोठ्या दूध उत्पादक व्यवस्थेचे वास्तव नांगरिकां समोर मांडले. त्यांनी पुण्यातील जंगली महाराज रस्त्यावरील संभाजी उद्यानासमोर चित्रप्रदर्शन आणि निदर्शना द्वारे जनजागृती केली. सध्या देशातील २० शहरांमध्ये हे युवक "दूध आणि मांस एकाच प्राण्याकडून येते" या वास्तवाकडे लक्ष वेधून घेत आहे. नागरिकांनी दुग्धव्यवसाय साखळीतून प्राण्यांचा प्रवास आणि शेवटी त्यांची मांस बाजारात होणारी विक्री यावर विचार करावा, असे आवाहन याद्वारे करण्यात आले. दुग्धव्यवसायामुळे होणाऱ्या पर्यावरणाच्या हानीवर विचार करण्यास देखील त्यांनी यावेळी भाग पाडले. भारतात एक लिटर दूध उत्पादनासाठी १०७८ लिटर पाणी लागते, जे आधीच पाणीटंचाईचा सामना करणाऱ्या देशासाठी मोठे संकट आहे. तसेच, पशुधनातून होणारे मिथेन उत्सर्जन हे जागतिक तापमानवाढीचे प्रमुख कारण मानले जात आहे, याकडे देखील यावेळी लक्ष वेधण्यात आले.



### गल्लीत ९०० मीटर रस्त्यासाठी १४६ मतदारांचा मतदान बहिष्कार

डांग,गुजरात (स. गांवकरी) : डांग जिल्ह्यातील सुबीर तालुक्यात निवडणुकीच्या वातावरणात धामाला फळियातून लोकशाहीच्या प्रक्रियेला मोठा धक्का बसल्याची घटना समोर आली आहे. निशाणा जिल्हा पंचायत मतदारसंघांतर्गत येणाऱ्या निशाणा गाव-२ मधील धामाला गल्लीतील रहिवाशांनी यंदा मतदानाचा हक्क न बजावता निवडणुकीचा बहिष्कार करण्याचा निर्णय घेतला. स्थानिक नागरिक अनेक वर्षांपासून मूलभूत सुविधांसाठी प्रयत्न करत आहेत. त्यांच्या मते, फक्त ९०० मीटरचा अंतर्गत रस्ता पक्का करण्याची मागणी वर्षानुवर्षे प्रलंबित आहे. रस्ता नसल्यामुळे विशेषतः पावसाळ्यात आणि आपत्कालीन परिस्थितीत ग्रामस्थांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतो. यासोबतच पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाईही या बहिष्कारामागील प्रमुख कारण ठरली आहे. वारंवार निवेदने देऊनही प्रशासनाकडून ठोस पावले उचलली गेली नाहीत. त्यामुळे अखेर ग्रामस्थांनी एकमुखाने मतदान न करण्याचा निर्णय घेतला.या गल्लीत एकूण १४६ नोंदणीकृत मतदार आहेत. लोकशाहीत प्रत्येक मत महत्त्वाचे असतानाही या सर्व मतदारांनी निषेध म्हणून मतदानापासून दूर राहणे पसंत केले. मतदानाच्या दिवशी मतदान केंद्रावर अधिकारी उपस्थित होते, मात्र संपूर्ण दिवसात एकही मतदार मतदानासाठी आला नाही. १४६ मतदारांच्या सामूहिक बहिष्कारामुळे प्रशासनात खळबळ उडाली आहे. स्थानिकांचे म्हणणे आहे की, जोपर्यंत त्यांच्या गल्लीत पक्का रस्ता आणि पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध होत नाही, तोपर्यंत हा विरोध कायम राहील. विकासाच्या दाव्यांमध्ये अशा दुर्गम भागातील वास्तव परिस्थिती प्रशासनासमोर गंभीर प्रश्न उभी करत आहे.




### कै. सुशिलाबाई कुरुमकर यांचे निधन

श्रीगोंदा (स. गांवकरी) : श्रीगोंदा तालुक्यातील लिंपणगाव येथील आदर्श माता कै. सुशिलाबाई नारायणराव कुरुमकर पाटील (वय ९३) यांचे नुकतेच वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांनी आयुष्यभर साधेपणा व आदर्श जीवनमूल्ये जपत कुटुंब आणि समाजात आपला ठसा उमटविला. त्यांच्या पश्चात चार मुले, एक मुलगी, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्या ज्येष्ठ पत्रकार नंदकुमार कुरुमकर, सुभाषराव कुरुमकर, सुदामराव कुरुमकर व राजेंद्र कुरुमकर यांच्या मातोश्री होत. त्यांच्या निधनाने लिंपणगाव परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.



### अंधश्रद्धेचा कळस: 'आईला बरे करतो' सांगून अल्पवयीन मुलीचे शोषण

जुन्नर (स. गांवकरी) : आईचा आजार बरा करण्याच्या बहाण्याने एका अल्पवयीन मुलीला जाळ्यात ओढून तिच्यावर अत्याचार करणाऱ्या दोन भोंदूबाबांच्या मुसक्या आळेफाटा पोलिसांनी आवळल्या आहेत. 'दैवी शक्ती'च्या नावाखाली सुरू असलेला हा नराधमपणा उघडकीस येताच जुन्नर तालुक्यात संतापाची लाट उसळली आहे. येडगाव येथील पंकज देवराम घोलप व नाना बर्डे, दोघेही (राहणार. येडगाव ता. जुन्नर ) अशी अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत. पीडित मुलीच्या आई आजारी असल्याचे हेरून या दोघांनी त्यांच्या घरात प्रवेश केला. "अंगारा आणि मंत्राने १०० टक्के गुण येतो" असे खोटे सांगून त्यांनी कुटुंबाचा विश्वास संपादन केला. याच गैरफायदा घेत मुख्य आरोपी पंकज घोलप याने पीडितेला लग्नाचे आमिष दाखवले. पोलिसांच्या माहितीनुसार, जानेवारी ते डिसेंबर २०२५ या कालावधीत आरोपीने पीडितेवर वारंवार अत्याचार केले. यातून पीडिता गर्भवती राहिली. मात्र, जेव्हा लग्नाचा विषय निघाला तेव्हा आरोपीने थेट नकार देत तिला व कुटुंबाला जीवे मारण्याची धमकी दिली. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच पीडितेने धाडस दाखवत आळेफाटा पोलीस ठाणे गाठले. पोलिसांनी तत्काळ भारतीय न्याय संहिता, पोक्सो कायदा आणि महाराष्ट्र जादूटोणा विरोधी कायद्यान्वये गुन्हा दाखल करून दोन्ही आरोपींना अटक केली. न्यायालयाने त्यांना सोमवारपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.या घटनेनंतर आळेफाटा पोलिसांनी नागरिकांना सज्जड इशारा दिला आहे. "आजारी पडल्यास मांत्रिक, भगत, भोंदूबाबा यांच्याकडे न जाता केवळ अधिकृत डॉक्टरांकडूनच उपचार घ्या. अंधश्रद्धेमुळे तुमचे आयुष्य उद्ध्वस्त होऊ शकते," असे आवाहन पोलीस निरीक्षकांनी केले आहे.

# शिक्षक उभयंत्यांचा सेवापूर्ती नागरी सत्कार समारंभ संपन्न

इंदापूर : (स. गांवकरी)




वडापुरी (ता- इंदापूर) येथे कृषीमंत्री दत्तात्रय भरणे व लोकनेते प्रदीप गारटकर यांच्या उपस्थितीत वडापुरी येथील सौ हर्षलता प्रकाश तोबरे व प्रकाश पांडुरंग तोबरे या शिक्षक उभयंत्यांचा सेवापूर्ती नागरी सत्कार समारंभ श्रीनाथ मित्रपरिवार, समस्त ग्रामस्थ वडापुरी व शिक्षक वृंद यांच्या वतीने (दि.२५ एप्रिल) पार पडला.

यावेळी कृषिमंत्री दत्तात्रय भरणे, लोकनेते प्रदीप गारटकर, जिल्हा परिषदेचे गटनेते श्रीमंत ढोले, महाराष्ट्र राज्य शिक्षक प्रतिनिधी सभा प्रदेशअध्यक्ष कालिदास माने, दत्तात्रय तोरस्कर, गफूर सय्यद यांनी आपली मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमात ज्येष्ठ व्यक्ती म्हणून प्रथम सत्कारमूर्ती प्रकाश तोबरे यांच्या आई पुतळाबाई पांडुरंग तोबरे यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. यावेळी कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी सेवापूर्ती शिक्षक उभयंतांनी विद्यार्थ्यांना घडवत असताना आपल्या डॉ. वैभव तोबरे, इंजिनिअर पंकज तोबरे, प्राध्यापक कोमल तोबरे या या मुलांना घडवले त्याबद्दल त्यांचे विशेष कौतुक केले.

यावेळी गटशिक्षणाधिकारी नवनाथ कुचेकर, वडापुरी पंचायत समिती सदस्य अर्चना खबाले, अर्बन बँकेचे माजी चेअरमन सत्यजित पाटील, राष्ट्रवादीचे तालुका कार्याध्यक्ष अतुल झगडे, तालुका प्रवक्ते संदेश देवकर , ज्येष्ठ नेते हनुमंत जगताप तोबरे, निराभिमाचे माजी संचालक,दत्तात्रेय शिर्के, राष्ट्रवादीचे जिल्हा अल्पसंख्यांक उपाध्यक्ष तय्यब शेख , नायब तहसीलदार प्रमोद तोबरे, महाराष्ट्र राज्य शिक्षक प्रतिनिधी सभा उपाध्यक्ष संजय अलमले,देविदास निंबाळकर, भाटनिमगाव चे माजी सरपंच अजित खबाले, वडापुरीचे माजी सरपंच अशोक फडतरे, वडापुरीची तंटामुक्ती अध्यक्ष शिवाजी तरंगे,पाणीपुरवठ्याचे उपाध्यक्ष प्रकाश मोहिते इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

दरम्यान माजी सहकार मंत्री हर्षवर्धन पाटील व भाजप नेते प्रवीण माने यांनी कार्यक्रमास भेट देऊन सत्कारमूर्ती प्रकाश तोबरे व हर्षलता तोबरे यांचा सन्मान करून शुभेच्छा दिल्या. यावेळी सत्कारमूर्ती प्रकाश तोबरे यांनी सत्काराला उत्तर देऊन आभार मानले. दरम्यान याप्रसंगी श्रीनाथ मित्र परिवाराच्या वतीने शैक्षणिक व सामाजिक कार्य संदर्भात प्रकाश तोबरे व सौ हर्षलता तोबरे यांचा तर वडापुरी गावातील लेखा कोषागार अधिकारी वित्त विभाग महाराष्ट्र शासन येथे नियुक्त झाल्याबद्दल निकिता नितीन भारती, पुणे पोलीस मध्ये भरती झाल्याबद्दल सागर आबासो देवकर, महाराष्ट्र केसरी कुस्ती सुवर्णपदक पटकवल्याबद्दल आकांक्षा सुरेश जाधव, अन्न व औषध प्रशासन विभाग अधिकारी म्हणून नियुक्त झाल्याबद्दल अमृता लालासो शिर्के, महापारेषण पुणे नियुक्त झाल्याबद्दल प्रतीक्षा अनिल गायकवाड, लोकल बँक ऑफिसर बँक ऑफ बडोदा येथे नियुक्ती झाल्याबद्दल संदीप सुरेश काकडे यांचा तर जिल्हा परिषद शाळा वडापुरी येथील इयत्ता पहिलीतील विद्यार्थिनी आरोही विठ्ठल कदम हिने मंथन परीक्षेत राज्यात अकरावा क्रमांक मिळवल्याबद्दल उपस्थितीत मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.

या कार्यक्रमाचे प्रस्तावित प्राध्यापक कोमल तोबरे यांनी केले तर आभार बापूसाहेब चंदनशिवे यांनी मानले. सूत्रसंचालन कालिदास आवाडे यांनी केले.

## प्रवाशाचा हरवलेला मोबाईल ऑटो चालकाने केला परत

तामसा : (स. गांवकरी)



शहरात वाढत्या गुन्हेगारीच्या पार्श्वभूमीवर एक सकारात्मक आणि प्रेरणादायी घटना समोर आली आहे. एका प्रामाणिक ऑटो चालकाने प्रवाशाचा हरवलेला मोबाईल परत करून इमानदारीचे उत्कृष्ट उदाहरण समाजासमोर ठेवले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, एका प्रवाशाने घाईगडबडीत हदगांव तामसा प्रवास करताना ऑटोमधून उतरताना आपला महागडा मोबाईल फोन ऑटोमध्येच विसरला. काही वेळानंतर ही बाब लक्षात येताच प्रवाशाने मोबाईल शोधण्याचा प्रयत्न केला, मात्र तोपर्यंत ऑटो पुढे निघून गेला होता. दरम्यान, संबंधित ऑटो चालकाच्या लक्षात मोबाईल आल्यावर त्याने कोणत्याही प्रकारचा गैरवापर न करता प्रामाणिकपणे तो परत करण्याचा निर्णय घेतला. मोबाईलमधील संपर्कांच्या आधारे चालकाने पोलीस ठाण्यात सपर्क करून प्रवाशाशी संपर्क साधला आणि त्याला सुरक्षितपणे मोबाईल परत दिला. आपला हरवलेला मोबाईल परत मिळाल्याने प्रवाशाने ऑटो चालक तानाजी नारखेडे व संघर्ष ऑटो युनियनचे रुपेश अमृते यांचे मनापासून आभार मानले. तसेच, चालकाच्या प्रामाणिकपणाचे सर्वत्र कौतुक होत असून, ही घटना समाजात इमानदारीचा सकारात्मक संदेश देणारी ठरत आहे. आजच्या काळात अशा प्रामाणिक वर्तनाच्या घटना दुर्मिळ होत चालल्या असताना, या ऑटो चालकाने दाखवलेली सचोटी इतरांसाठीही प्रेरणादायी ठरत आहे.

## श्री नागेश विद्यालयाचे परीक्षेत ११ विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक




जामखेड : (स. गांवकरी)


रयत शिक्षण संस्थेच्या श्री नागेश विद्यालय, जामखेडने राष्ट्रीय आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक शिष्यवृत्ती परीक्षेत एन एम एम एस परीक्षेत (NMMS) दैदिप्यमान यश संपादन केले आहे. शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये घेण्यात आलेल्या या परीक्षेत विद्यालयाचे तब्बल ११ विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक ठरले असून, विद्यालयाने आपली उज्ज्वल यशाची परंपरा कायम राखली आहे. श्री नागेश विद्यालयातील बोधले आयुष अविनाश (१४९ गुण), खैरे संचित संतोष (१४९ गुण), भोंडवे यश महादेव (१४७ गुण), वराट यशराज शहादेव (१४५ गुण), भवर यश शंकर (१४४ गुण), माळी कृष्णा नानासाहेब (१२९ गुण), वटाणे ओंकार सुभाष (१२९ गुण), पवार अथर्व हर्षल कुमार (१२८ गुण), धुमाळ सोहम किशोर (१२८ गुण), सानप सार्थक संदीप (११९ गुण), भोसले समर्थ शंकर (९१ गुण) अशा एकुण ११ विद्यार्थ्यांनी यश संपादन केले आहे. विद्यालयातील या विद्यार्थ्यांनी आपल्या यशाने शाळेचा नावलौकिक वाढवला आहे. वरील शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरलेल्या या विद्यार्थ्यांना पुढील चार वर्षांत प्रत्येकी ४८००० रुपये, असे एकूण ५,२८,००० रुपयांचे अर्थसाहाय्य मिळणार आहे. या यशामागे विद्यालयाचे मुख्याध्यापक मडके बी.के., पर्यवेक्षक जाधवर सर, गुरुकुल प्रमुख आणि शिष्यवृत्ती विभाग प्रमुख यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. विशेषतः श्री. लटपटे डी.व्ही. (सामाजिक शास्त्रे), श्री. चौधरे ए.बी. (गणित), श्री. पठाण ए.एन. (सामान्य विज्ञान), श्री. देशमुख एस.एस. (बुद्धिमत्ता चाचणी), श्री. पवार एस.एस. आणि श्री. ससाणे एस.आर. या शिक्षकांनी विद्यार्थ्यांची कसून तयारी करून घेतली होती. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल आमदार रोहित दादा पवार, राजेंद्र कोठारी, हरिभाऊ बेलेकर, विनायक राऊत आणि स्थानिक स्कूल कमिटीच्या सदस्यांनी विद्यार्थ्यांचे व शिक्षकांचे अभिनंदन केले आहे.

श्री नागेश विद्यालयातील विद्यार्थ्यांनी जिद्द, मेहनत आणि योग्य मार्गदर्शनाच्या जोरावर मिळवलेले हे यश इतर विद्यार्थ्यांसाठी निश्चितच प्रेरणादायी ठरणार आहे.

## अनधिकृत संगणक प्रमाणपत्रांपासून सावध राहा

भिवंडी : (स. गांवकरी)

■ पडघ्यात 'ओम शांती कॉम्प्युटर क्लासेस'चा विद्यार्थ्यांना सल्ला



भिवंडी तालुक्यातील पडघा परिसरात संगणक शिक्षणाचे महत्त्व दिवसेंदिवस वाढत असून, विद्यार्थ्यांनी योग्य आणि अधिकृत संस्थेची निवड करणे अत्यंत आवश्यक बनले आहे. अनधिकृत संगणक क्लासेसकडून दिल्या जाणाऱ्या प्रमाणपत्रांमुळे भविष्यात नोकरीच्या संधींवर परिणाम होऊ शकतो, त्यामुळे विद्यार्थ्यांनी व पालकांनी सतर्क राहण्याची गरज व्यक्त केली जात आहे. पडघा येथील ओम शांती कॉम्प्युटर क्लासेस ही संस्था सरकारमान्य अभ्यासक्रम व प्रमाणपत्रे देणारी अधिकृत संस्था म्हणून पुढे येत आहे. या संस्थेत महाराष्ट्र नॉलेज कार्पोरेशन लिमिटेड (एमकेसीएल) मान्यताप्राप्त कोर्सेस उपलब्ध असून, विद्यार्थ्यांना 'सरकार मान्य' सर्टिफिकेट्स दिली जातात. आजच्या स्पर्धात्मक युगात अशा प्रमाणपत्रांना मोठे महत्त्व असल्याने ते नोकरी मिळविण्यासाठी उपयुक्त ठरत आहेत. परिसरातील काही खाजगी संगणक क्लासेसमध्ये अधिकृत प्रमाणपत्रांची सुविधा नसल्यामुळे विद्यार्थ्यांना भविष्यात अडचणींचा सामना करावा लागू शकतो. याउलट, ओम शांती कॉम्प्युटर क्लासेसमध्ये विद्यार्थ्यांना बेसिक संगणक ज्ञानासोबतच आधुनिक तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण दिले जाते. यामध्ये आर्टिफिशियल इंटेलिजन्स (AI), एमएस ऑफिस, इंटरनेट वापर, डिजिटल कौशल्ये तसेच ऑनलाईन व्यवहार यांचा समावेश आहे. संस्थेचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांना आत्मनिर्भर बनवणे आणि त्यांना रोजगारक्षम कौशल्ये प्रदान करणे हा आहे. अनुभवी शिक्षकांचे मार्गदर्शन, प्रात्यक्षिक (प्रॅक्टिकल) प्रशिक्षण आणि सुसज्ज सुविधा यामुळे विद्यार्थी आत्मविश्वासाने पुढे जात असल्याचे सांगितले जाते.

पालकांनी आपल्या मुलांच्या उज्ज्वल भविष्यासाठी योग्य शिक्षणसंस्था निवडणे गरजेचे असल्याचे तज्ज्ञांनी नमूद केले आहे. सरकारमान्य प्रमाणपत्रे, आधुनिक अभ्यासक्रम आणि करिअरच्या संधी उपलब्ध करून देणारी ही संस्था पडघा परिसरात विश्वासार्ह पर्याय ठरत आहे. दरम्यान, संस्थेचे संचालक संजय पटेल यांनी विद्यार्थ्यांना विविध संगणक कोर्सेससाठी प्रवेश घेण्याचे आवाहन केले आहे. इच्छुक विद्यार्थ्यांनी अधिक माहितीसाठी 8087355556 किंवा पूजा पवार (8956588681) या क्रमांकांवर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.



## शॉर्ट सर्किटमुळे लागलेल्या आगीत घराचे नुकसान

ओतूर : (स. गांवकरी)

जुन्नर तालुक्यातील अहिनवेवाडी येथील गोंदेवाडी आदिवासी वस्तीत मारुती धर्मा जाधव यांच्या घराला इलेक्ट्रिक शॉर्ट सर्किटमुळे आग लागून मोठे नुकसान झाले. मात्र, घरातील दोन ते अडीच वर्षांच्या चिमुरडीच्या सतर्कतेमुळे संभाव्य मोठी दुर्घटना टळली. मिळालेल्या माहितीनुसार, ही घटना रात्रीच्या सुमारास घडली. आग लागल्याचे पाहून झोपेतून जागी झालेल्या चिमुरडीने तत्काळ घराबाहेर येत आरडाओरडा केला. तिच्या आवाजामुळे शेजारील नागरिक जागे झाले आणि घटनास्थळी धाव घेतली. ग्रामस्थांच्या तत्परतेने आग आटोक्यात आणण्यात यश आले. या आगीत घरातील कपडे, फ्रिज, साठवलेले धान्य, कपाट तसेच इतर जीवनावश्यक वस्तू जळून खाक झाल्या असून कुटुंबाचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.

घटनेची माहिती मिळताच गोंदेवाडीतील महिला, पुरुष व युवकांनी मदतकार्य केले. तसेच उल्हास डुंबरे यांनी माजी सरपंच सविता अहिनवे व माजी उपसरपंच स्वप्नील अहिनवे यांना कळविले. त्यांनी तात्काळ घटनास्थळी भेट देऊन मदतकार्य सुरू केले. यासोबतच महावितरण कर्मचारी व कामगार तलाठी यांनाही घटनेची माहिती देण्यात आली.

# मध्यवर्ती सहकारी बँकेच्या जुन्या इमारतीचा लोकार्पण सोहळा, लाखो रुपयांची उधळपट्टी

## पूर्वपदावर आलेल्या बँकेवर पुन्हा राजकीय सावट

बिलोली : (स. गांवकरी)

नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक गेल्या काही दशकांपासून विविध आर्थिक आणि प्रशासकीय घोटाळ्यांच्या आरोपांमुळे चर्चेत राहिली आहे. ही बँक हळूहळू आर्थिक नफेच्या पूर्वपदावर येत असताना संचालक मंडळानीं बँकेचा कारभार पुन्हा त्याच व्यक्तीकडे सोपविला आहे, त्यामुळे बँकेवर परत राजकीय सावट निर्माण होणार असल्याचे दिसून येते, नव्याने कारभार हाती येताच जिल्ह्यासह बिलोली शाखेच्या जुन्या इमारतीच्या नूतनीकरनासाठी लाखो रुपयांची उधळपट्टी करून दि.२५ एप्रिल रोजी लोकार्पण सोहळा आटोपला आहे.

मागील काळात बँकेत नियमबाह्य कर्जवाटप, संगणक खरेदीतील घोटाळा आणि राजकीय हस्तक्षेपामुळे बँक अनेकदा आर्थिक अडचणीत सापडली होती, अशाने बँकेचा परवाना धोक्यात येण्यापर्यंतची परिस्थिती निर्माण झाली होती. यामुळे बँकेच्या विश्वासार्हतेवर परिणामही झाला,

खरेदीतही मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाले. सहकारी मजूर संस्था, सहकारी पतपेढ्या, सहकारी साखर कारखाने या संस्थांना बँकेने विनातारण कर्ज दिल्याने बँक डबघाईस आली. यामुळे शेतकरी व ठेवीदारांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले होते. म्हणून राज्याच्या लोकायुक्तांनी बँकेचे संचालक आणि अधिकाऱ्यांनी संगनमताने करोडो रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचे



लक्षात येताच पोलिसांना गुन्हे दाखल करण्याचे आदेश दिले होते. आणि माजी आमदार डॉ. डी. आर. देशमुख यांनी २०१४ मध्ये यासंबंधी तक्रारही केली होती, ज्यामध्ये गेल्या १५ वर्षांपासून बँकेत भ्रष्टाचार सुरू असल्याचा आरोप करण्यात आला होता.त्यापाठोपाठ २०२५ मधील १५६ पदांच्या नोकरभरती प्रक्रियेवरून मोठा वाद निर्माण झाला होता. सरकारनामानुसार सर्वात कमी दराची निविदा देणाऱ्या एमकेसीएल ऐवजी पुण्याच्या एका खाजगी कंपनीला (वर्कवेल इन्फोटेक) परीक्षा घेण्याचे कंत्राट देण्यात आल्याने पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले होते.कारण संचालकांनी नोकर भरतीत आपल्या नातेवाईकांची वर्णी लावण्यासाठी ही खेळी केल्याचा आरोप करण्यात आला होता. या बोगस नोकर भरती प्रक्रिय विरुद्ध आमदार राजेश पवार यांनी विधानसभेत आवाज उठवला यानुसार मुख्यमंत्री कार्यालयाने या कथित घोटाळ्याची दखल घेऊन चौकशीचे आदेशही देण्यात आले होते.त्यातच घोटाळेबाजाचे भाजप अध्ये प्रवेश झाला यामुळे हे प्रकरण दाबल्या गेलं. हे गंभीर प्रकरण ताजे असतानाही संचालक मंडळानीं पुन्हा बँकेचा कारभार त्याच व्यक्तीकडे सोपाविला आहे. ज्यामुळे हळूहळू आर्थिक नफेच्या पूर्वपदावर येत असलेल्या बँकेवर पुन्हा राजकीय सावट निर्माण होत आहे, कारभार आपल्या हाती येताच संबंधिताने पुन्हा तिजोरीवर डोळा ठेऊन आपल्या मार्जितल्या गुत्तेदारा मार्फत जिल्ह्यासह बिलोली शाखेच्या जुन्या इमारतीलाच डागडुजीने नूतनीकरण करून लाखो रुपयांची उधळपट्टी केली.

### भास्करराव यांचे अशोक चव्हाण प्रति जपमंत्र

मागील दोन वर्षांपूर्वी माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांच्या आग्रहाखातर मी बँकेच्या अध्यक्षपदी विराजमान झालो. आता या वयातही अशोकरावामुळे मला जबाबदारी मिळाली. आणि पूर्वी ही बँक दिवाळखोरीत निघाली होती. तेव्हाही बँकेला तात्कालीन पालकमंत्री अशोकराव चव्हाण यांनी बँकेला पुनर्जन्म दिले. या अशोक जपमंत्रामुळे खतगांवकर पुन्हातर भाजपाच्या वाटेवर जाणार तर नाहीत ना....? अशी कार्यक्रमा दरम्यान चर्चा रंगली होती.

# थोडक्यात पण महत्वाचे



## मॉन्ट्रा इलेक्ट्रिककडून इलेक्ट्रिक स्मॉल ट्रक श्रेणीचा विस्तार

पुणे (स. गांवकरी) : Montra Electric या मुरुगप्पा समूहाच्या क्लीन मोबिलिटी ब्रँडने इलेक्ट्रिक लहान ट्रक श्रेणीचा विस्तार करत दोन नवे व्हेरिएंट्स — EVIATOR 350 (32kWh) आणि EVIATOR 350L+ (50kWh) सादर केले आहेत. EVIATOR 350 (32kWh) हा प्रामुख्याने शहरातील दैनंदिन मालवाहतुकीसाठी तयार करण्यात आला असून तो प्रत्यक्ष वापरात सुमारे १४० किलोमीटरपर्यंत अंतर पार करू शकतो. लास्ट माईल डिलिव्हरीसाठी हा किफायतशीर आणि कार्यक्षम पर्याय मानला जात आहे. दुसरीकडे, EVIATOR 350L+ (50kWh) हा लांब पल्ल्याच्या तसेच आंतरशहरी वाहतुकीसाठी डिझाइन करण्यात आला आहे. या ट्रकची प्रमाणित रेंज ३०० किलोमीटरपेक्षा जास्त असून प्रत्यक्ष वापरात तो २०० किलोमीटरपेक्षा अधिक अंतर सहज पार करतो. त्यामुळे रेंज संपण्याची चिंता मोठ्या प्रमाणात कमी होते. तसेच, रेफ्रिजरेटेड ट्रान्सपोर्ट आणि महापालिका सेवांसारख्या अधिक ऊर्जा लागणाऱ्या कामांसाठीही हा व्हेरिएंट सक्षम ठरतो. कंपनीच्या मते, हा विस्तार त्यांच्या प्रत्यक्ष वापरातील अनुभवावर आधारित आहे. मॉन्ट्रा इलेक्ट्रिकच्या ६०० हून अधिक वाहनांनी मिळून आतापर्यंत ६५ लाख किलोमीटरहून अधिक अंतर पार केले आहे.

## डॉ. विश्वासराव आरोटे यांच्यावतीने आभाळे यांचा वाढदिवस उत्साहात



अकोले (स. गांवकरी) : अकोले तालुक्यातील प्रवरा परिसरातील वारकरी संप्रदायातील ज्येष्ठ व्यक्तिमत्व तसेच अकोले बाजार समितीचे सेवानिवृत्त अधिकारी आभाळे साहेब यांचा वाढदिवसानिमित्त सत्कार सोहळा उत्साहात पार पडला. यावेळी आभाळे साहेब यांना शाल, पुष्पगुच्छ, पेढे व बॅग देऊन सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमात महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस तथा दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे, पत्रकार संघाचे सचिव हरीभाऊ फापाळे, वारकरी संप्रदायातील ह.भ.प. शांताराम महाराज पापळ, तसेच महीपाल देशमुख आदी मान्यवर उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी आभाळे साहेब यांच्या सामाजिक व प्रशासकीय कार्याचा गौरव करत त्यांच्या पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमात उपस्थितांनी त्यांच्या कार्याची आठवण सांगत कृतज्ञता व्यक्त केली. हा सत्कार सोहळा अत्यंत आपुलकीच्या वातावरणात पार पडला.

## आनंदगड शैक्षणिक संकुलात २०२६-२७ साठी प्रवेश सुरू!

अकोले (स. गांवकरी) : वीरगाव (ता. अकोले, जि. अहिल्यानगर) येथील आनंदगड शैक्षणिक संकुलात शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी विविध अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. गुणवत्तापूर्ण शिक्षण व आधुनिक सुविधा उपलब्ध करून देणारे हे संकुल विद्यार्थ्यांसाठी आकर्षणाचे केंद्र ठरत आहे. या संकुलाअंतर्गत धर्मवीर आनंद दिघे हायस्कूल व ज्युनियर कॉलेज, मातोश्री राधा कॉलेज ऑफ फार्मसी (डी-फार्म, बी.फार्म), आनंदगड पॉलिटेक्निक कॉलेज तसेच मातोश्री भंगूबाई शिंदे अॅक्यूपंक्चर कॉलेजमध्ये प्रवेश सुरू आहेत. पॉलिटेक्निकमध्ये सिव्हिल, कॉम्प्युटर, इलेक्ट्रिकल अॅण्ड इलेक्ट्रॉनिक्स तसेच आर्टिफिशियल इंटेलिजन्स व मशीन लर्निंग यांसारख्या आधुनिक शाखांमध्ये शिक्षणाची सुविधा उपलब्ध आहे. अनुभवी प्राध्यापकवर्ग, सुसज्ज प्रयोगशाळा व विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रम राबवले जात असल्याचे संस्थेकडून सांगण्यात आले. प्रवेश इच्छुक विद्यार्थ्यांनी लवकरात लवकर संपर्क साधावा, असे आवाहन संस्थेकडून करण्यात आले आहे. संपर्क: 9922545516 / 9765431168 / 9422190696 / 9834719663 / 9209645837

## एलपीजी संकटाचा कॉन्ट्रॅक्ट फूड सर्व्हिसेस क्षेत्रावर ताण

पुणे (स. गांवकरी) : भू-राजकीय संघर्षामुळे एलपीजी च्या वाढत्या किमती आणि वाढलेले अनुपालन (compliance) खर्च यामुळे भारतातील कॉन्ट्रॅक्ट फूड सर्व्हिसेस क्षेत्रास गंभीर कार्यात्मक अडचणींचा सामना करावा लागत आहे. इंधनटंचाईमुळे वाढलेले खर्च, निश्चित दराच्या करारांमुळे खर्चवाढ झेलण्यास मर्यादा आणि कडक नियमांमुळे कार्यपद्धती अधिक गुंतागुंतीची झाली आहे. विशेषतः लघु व मध्यम उद्योगांसाठी ही परिस्थिती अधिक आव्हानात्मक ठरत आहे. यासंदर्भात, दररोज ३.५ लाखांहून अधिक जेवण पुरवणाऱ्या 'रॅसेंस' या अग्रगण्य फूड सर्व्हिस प्रदात्याचे सीईओ आणि एमडी संजय कुमार म्हणाले, "सध्याची एलपीजी टंचाई आणि वाढत्या किमतींमुळे उद्योगासमोर मोठ्या अडचणी निर्माण झाल्या आहेत. यावर उपाय म्हणून आम्ही आमच्या ग्राहकांसोबत मेन्यूमध्ये बदल करत आहोत, ज्यामुळे गॅसचा वापर कमी करता येईल." ते पुढे म्हणाले, "आमची दररोजची एलपीजी ची गरज पूर्वी १३५–१४० सिलिंडर होती, ती आता ८५–९० सिलिंडरपर्यंत कमी झाली आहे. या परिस्थितीला तोंड देण्यासाठी आम्ही स्टीम कुकिंगवर अधिक भर देत आहोत, आहारात सॅलड आणि दही यांचा समावेश वाढवत आहोत, तसेच काही ठिकाणी जळण लाकडाचा वापरही करत आहोत. यासोबतच अन्न वाया जाणे कमी ठेवणे आणि प्रति व्यक्ती अन्नखर्च कमी करणे यावरही लक्ष देत आहोत, मात्र उत्पादनावर कोणताही परिणाम होऊ देत नाही."

## AIच्या युगात रोजगाराचा प्रश्न गंभीर आव्हान : राजेश अग्रवाल



पुणे (स. गांवकरी) : देशात आणि जगभरात वेगाने वाढत असलेल्या आर्टिफिशियल इंटेलिजन्स (AI) आणि ऑटोमेशन तंत्रज्ञानामुळे लाखो लोकांच्या रोजगारावर होत असलेल्या परिणामाबाबत अग्रवाल मारवाडी चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीज अँड एज्युकेशन (AMCCIE) यांनी गंभीर चिंता व्यक्त केली आहे. चेंबरचे राष्ट्रीय अध्यक्ष राजेश अग्रवाल यांनी सांगितले की, तांत्रिक प्रगती अपरिहार्य आहे, मात्र त्यातून निर्माण होणारा रोजगारातील असमतोल हा एक मोठा सामाजिक व आर्थिक प्रश्न बनत चालला आहे. ते म्हणाले, "AI आणि नवीन तंत्रज्ञानामुळे पारंपरिक नोकऱ्यांमध्ये घट होत असून मोठ्या प्रमाणावर लोक प्रभावित होत आहेत. हा विषय केवळ आर्थिक नसून सामाजिक स्थैर्याशीही संबंधित आहे." मात्र त्यांनी हेही स्पष्ट केले की प्रत्येक तांत्रिक बदलासोबत नवीन संधीही निर्माण होत असतात. "AI रोजगार संपवत नाही, तर रोजगाराचे स्वरूप बदलते.

# पाणी-चारा टंचाईबाबत उपाययोजना करा

**जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया : कर्जत तालुक्यातील विविध गावांचा जिल्हाधिकाऱ्यांकडून प्रशासकीय कामकाजाचा आढावा**

कर्जत : (स. गांवकरी)

कर्जत व जामखेड तालुक्यात उन्हाची वाढती तीव्रता, संभाव्य अवकाळी पाऊस व टंचाई परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर आपत्ती व्यवस्थापन यंत्रणेने सतर्क राहून पशुधन व नागरिकांना दिलासा द्यावा. प्रलंबित कामे मुदतीत पूर्ण करून पाणी व चारा टंचाईबाबत तातडीने उपाययोजना अंमलात आणाव्यात, असे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी दिले.



जिल्हाधिकारी डॉ.पंकज आशिया यांनी शुक्रवारी (दि.२४) रोजी कर्जत तालुक्यातील विविध गावांना भेट देत मिरजगाव येथील प्राथमिक आरोग्य केंद्राची पाहणी, उष्माघात सेंटरला भेट देऊन आरोग्य विभागाकडून माहिती आढावा घेतला. कर्जत तालुक्याच्या दौऱ्यात विविध शासकीय कार्यालये व प्रकल्पांना दिलेल्या भेटीप्रसंगी जिल्हाधिकाऱ्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना सूचना दिल्या.

या दौऱ्यात त्यांच्या समवेत कर्जतचे प्रांताधिकारी नितीन पाटील, पोलीस उपअधीक्षक प्रवीण लोखंडे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभियंता प्रशांत वाकचौरे, पोलीस निरीक्षक सोपान शिरसाट व उपजिल्हा रुग्णालयाचे डॉ. महारुद्र खरपाडे यांच्यासह विविध विभाग प्रमुख उपस्थित होते.

जिल्हाधिकारी डॉ. आशिया म्हणाले, "सध्या वाढत्या उष्णतेच्या पार्श्वभूमीवर उष्माघात कक्षात केवळ पंख्यांवर अवलंबून न राहता, रुग्णांसाठी तातडीने कुलरची व्यवस्था करण्यात यावी. मागील सहा महिन्यांपासून बंद असलेल्या शस्त्रक्रिया कक्षाची दुरुस्ती करून तो तात्काळ सुरू करण्यात यावा. नैसर्गिक पाण्याचे जलस्रोत, पाण्याची पातळी व पाण्याचा अवैध उपसा रोखण्यासाठी सर्व प्रशासकीय विभागांनी संयुक्त कारवाई करावी."

कर्जत तहसील कार्यालयात प्रशासनातील सर्व विभाग प्रमुखांची टंचाई आढावा बैठक घेत खते, बियाणे व आरोग्य विभागाचा आढावा घेऊन आवश्यक सुधारणा करण्याच्या सूचना दिल्या.

निमगाव डाकू येथील मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी प्रकल्पाला भेट देऊन कामाच्या प्रगतीचा आढावा घेतला. या प्रकल्पासाठी आवश्यक निधी उपलब्ध असून उर्वरित कामे ऑक्टोबरपर्यंत पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या. रातंजन येथील लोकसहभागातून तयार केलेल्या शिवरस्त्याची पाहणी करून शेतकऱ्यांशी संवाद साधला. टाकळी खांडेश्वरी येथे बांबू शेती प्रकल्पाला भेट देऊन कृषी विभागाच्या योजनांबाबत माहिती घेतली. दौऱ्यादरम्यान ५० खाटांच्या ग्रामीण रुग्णालयाच्या बांधकामाची पाहणी करून कामाची गती वाढविण्याचे त्यांनी निर्देश दिले.

प्रशासकीय समन्वय राखत सर्व अधिकारी, विभाग प्रमुखांनी बैठका व क्षेत्रीय भेटींना स्वतः उपस्थित राहावे, अशा सूचनाही जिल्हाधिकाऱ्यांनी केल्या. मिरजगाव येथील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या पाहणीत माता व बालसंगोपन कार्यक्रमांतर्गत निश्चित प्रसूती उद्दिष्टाच्या तुलनेत प्रसूतीचे प्रमाण कमी असणे ही चिंतेची बाब असून जनजागृतीपर कार्यक्रम राबवून यात सुधारणा करावी. येथील प्रस्तावित स्थलांतर प्रक्रियेबाबतही त्यांनी चर्चा केली.

## राजाभाऊ कुमकर यांच्या कन्येच्या विवाह सोहळ्यात डॉ. विश्वासराव आरोटे यांची सदिच्छा भेट!



अकोले : (स. गांवकरी)

अकोले तालुक्यातील ज्येष्ठ नेते राजाभाऊ कुमकर यांच्या कन्या श्वेता आणि चि. तुषार यांच्या विवाह सोहळ्याप्रसंगी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस तथा दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे यांनी उपस्थित राहून नवदांपत्यास शुभाशिर्वाद देत सदिच्छा भेट दिली. यावेळी डॉ. आरोटे यांनी राजाभाऊ कुमकर व त्यांच्या परिवारास शुभेच्छा देत नवदांपत्याच्या भावी आयुष्यासाठी मंगलकामना व्यक्त केल्या. विवाह सोहळा आनंदी व उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला असून विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती लाभली.

## देवस्थान जमिनींच्या खरेदी-विक्रीचा मार्ग मोकळा होण्याची चिन्हे

- कुळांना मालकी हक्क देण्याबाबत महसूल मंत्र्यांचे मोठे संकेत!
- देवस्थान कुळांच्या हक्कासाठी विश्वासराव आरोटे यांचा पुढाकार
- महसूल मंत्र्यांचे सकारात्मक आश्वासन!

(स. गांवकरी)

राज्यातील लाखो शेतकरी, कुळ आणि देवस्थान जमिनीवर पिढ्यान्पिढ्या शेती करणाऱ्या कुटुंबांसाठी अत्यंत दिलासादायक बातमी समोर आली आहे. देवस्थानच्या नावे असलेल्या जमिनींच्या खरेदी-विक्रीवरील निर्बंध शिथिल करून त्या जमिनीवरील कुळांना मालकी हक्क देण्याच्या दिशेने राज्य सरकार सकारात्मक पावले उचलत असल्याचे संकेत महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले आहेत. महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस डॉ. विश्वासराव आरोटे यांनी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची भेट घेऊन देवस्थान जमिनींचा प्रश्न तातडीने मार्गी लावण्याची मागणी केली. यावेळी त्यांनी राज्यातील लाखो कुळांना भेडसावणाऱ्या अडचणींचे निवेदन सादर करत हा विषय शासनाच्या गांभीर्याने विचाराधीन घ्यावा, अशी मागणी केली. त्यावर प्रतिक्रिया देताना महसूल मंत्र्यांनी "कुळ कायद्यांतर्गत प्रलंबित असलेले अधिकार आणि खरेदी-विक्रीचे व्यवहार लवकरच मार्गी लावले जातील," असे स्पष्ट आश्वासन दिले.



महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणावर जमीन 'देवस्थान इनाम' किंवा मंदिरांच्या नावे नोंद असून या जमिनींवर अनेक दशकांपासून कुळ म्हणून शेतकरी शेती करत आहेत. मात्र सातबारा उताऱ्यावर मंदिर अथवा देवस्थानाचे नाव असल्यामुळे प्रत्यक्ष जमीन कसणाऱ्या कुळांना मालकी हक्क मिळवण्यात मोठ्या अडचणी येत आहेत. या जमिनींच्या खरेदी-विक्रीसाठी धर्मादाय आयुक्तांची परवानगी घेणे बंधनकारक असल्याने प्रक्रिया अत्यंत गुंतागुंतीची आणि वेळखाऊ ठरत आहे. परिणामी अनेक व्यवहार वर्षानुवर्षे प्रलंबित राहिले असून काही ठिकाणी अवैध व्यवहारांनाही खतपाणी मिळत असल्याची वस्तुस्थिती समोर आली आहे. डॉ. विश्वासराव आरोटे यांनी निवेदनात नमूद केले की, इतर जमिनींबाबत ज्या पद्धतीने कुळ कायदा लागू करून शेतकऱ्यांना मालकी हक्क देण्यात आले, त्याच धर्तीवर देवस्थान जमिनींबाबतही ठोस आणि स्पष्ट धोरण शासनाने स्वीकारावे. कुळांना अधिकृत खरेदी-विक्रीचे अधिकार मिळाल्यास ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना मिळेल आणि शेतकऱ्यांचा अनेक वर्षांचा न्यायाचा लढा संपुष्टात येईल, असे त्यांनी अधोरेखित केले. महसूल मंत्री बावनकुळे यांनी यावेळी स्पष्ट केले की धर्मादाय आयुक्त कार्यालय आणि महसूल विभाग यांच्यातील समन्वयाअभावी अनेक प्रकरणे रखडलेली आहेत.

मात्र आता शासन अशा जमिनींचे वर्गीकरण करून ज्या ठिकाणी कुळांचे अधिकार स्पष्ट आहेत त्या प्रकरणांमध्ये खरेदी-विक्रीसाठी स्वतंत्र आणि सुटसुटीत नियमावली तयार करण्याच्या तयारीत आहे.

## अॅमेझॉन एमएक्स प्लेअरवर उलगडणार विस्मृतीत गेलेल्या प्रेमाची आणि दुसऱ्या संधीची कथा कॅम्पस बीट्स रिटर्न्स, प्रेमाची नवीन बाजू पहा- ट्रेलर प्रसिद्ध

मुंबई : (स. गांवकरी)

अॅमेझॉन एमएक्स प्लेयर, भारतातील आघाडीची विनामूल्य, प्रीमियम, जाहिरात-समर्थित व्हिडिओ स्ट्रीमिंग सेवेने, तब्बल पाच सीझन मिळवलेल्या अफाट प्रेमाच्या जोरावर, आज कॅम्पस बीट्स रिटर्न्सचा बहुप्रतिक्षित ट्रेलर प्रदर्शित केला. बनिजय एशियाने निर्मित केलेली ही मालिका पल्की मल्होत्राने लिहिली असून सर्जनशीलरित्या रचली आहे. तसेच अनिरुद्ध राजदेरकर यांनी ती दिग्दर्शित केली आहे. या कलाकृतीत शांतनु माहेश्वरी, श्रुती सिन्हा, सहज सिंग चहल, दीपांकना दास, अदनान अहमद यांच्यासोबत पारस कलनावत, चाँदनी शर्मा आणि सुवंश धर अशा कलाकारांचा समावेश आहे. नाट्यमयता आणि भावना या दोन्हींवर भर देत, चाहत्यांची आवडती फ्रँचायझी अधिक दिलदार, नाट्य- नृत्याने बहरलेला धमाकेदार आणि अविस्मरणीय अनुभव देणार आहे. परंतु यावेळी, केवळ कथनाच्या ओघाने कथा पुढे जाणार नसून ती पूर्णपणे डोक्यात घोंगावत राहील.




प्रेमाचा नवीन पदर उलगडताना ट्रेलरमध्ये इशान आणि नेत्राच्या प्रवासातील भावनिक वळण पाहायला मिळते. एकीकडे त्यांचे प्रेम फुलायला लागते मात्र नियतीच्या कल्पना निराळ्या असतात. नेत्रा एक नवीन जीवन सुरू करताना दिसते आणि सुमेरच्या रुपाने तिला नवीन प्रेम लाभते. तिला परत आपल्या जीवनात आणण्याचा निर्धार करून, इशान तिचा पाठलाग करतो. परंतु गोष्टी पूर्वीसारख्या सोप्या राहत नाहीत, नवीन समीकरणे तयार होऊ लागतात. जे उलगडते ते प्रेम, गोंधळ आणि बदलत्या बंधांचे मिश्रण! जिथे भूतकाळ दफन होण्यास तयार नसतो. हाय-व्होल्टेज डान्स फेस-ऑफ, स्लो-बर्न स्पर्धा आणि पार्श्वभूमीत बंदिस्त होण्यास नकार देणारे एक रहस्य, हा सीझन केवळ अपेक्षा वाढवणारा नाही तर कथेची पकड घट्ट करतो. रहस्ये गळून पडू लागतात, निष्ठा पूर्वीसारखी टिकत नाहीत आणि ओळखी अस्पष्ट होऊ लागतात. ज्यामुळे कथा प्रेम आणि रहस्यमयतेच्या गर्तेत ओढली जाते. सर्व गोंधळ आणि निर्विवाद केमिस्ट्रीमध्ये, एक प्रश्न शांतपणे डोकं वर काढतोः नेत्राला आयुष्यात परत आणण्यासाठी इशानचे प्रेम पुरेसे ठरेल का?

अॅमेझॉन एमएक्स प्लेअरचे हेड ऑफ कंटेंट, अमोघ दुसाद यांनी सांगितले, "कॅम्पस बीट्स ही आमच्यासाठी तरुण प्रेक्षकांमध्ये विशेष लोकप्रिय ठरलेली आणि सर्वाधिक काळ सुरू असलेली फ्रँचायझी आहे. या नव्या पर्वात आम्ही भावनांची अधिक सखोलता, जोशपूर्ण नृत्य आणि आत्ताच्या प्रेक्षकांना गुंतवून ठेवणारे अनपेक्षित वळण यांचा सुरेख मेळ साधत आमच्या सादरीकरणाच्या कक्षा आणखी विस्तारल्या आहेत. हा नवीन सीझन प्रेक्षकांसमोर सादर करताना आम्हाला खूप आनंद होत आहे—आणि तो प्रेक्षकांना अॅमेझॉन एमएक्स प्लेयरवर विनामूल्य पाहता येईल." नवीन सिझनबद्दल बोलताना शांतनु माहेश्वरी म्हणाले, "नृत्य माझ्या मनाच्या खूप जवळचं आहे, आणि कॅम्पस बीट्स मुळे मला गेल्या काही वर्षांत ते साजरं करण्याची एक हक्काची जागा दिली आहे. या सिझनमध्ये इशानचा प्रवास अधिक अंतर्मुख आहे. तो एका अशा गोष्टीला धरून ठेवण्याचा प्रयत्न करत आहे, जी दुसऱ्या व्यक्तीसाठी आता अस्तित्वातच नाही. ही असमतोल परिस्थिती सगळंच बदलून टाकते.

## आनंदगड पॉलिटेक्निक कॉलेजमध्ये प्रवेश सुरू!

अकोले : (स. गांवकरी)

अकोले तालुक्यातील आनंदगड, वीरगाव येथील आनंदगड पॉलिटेक्निक कॉलेजमध्ये दहावीनंतरच्या विद्यार्थ्यांसाठी पॉलिटेक्निक डिप्लोमा अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेला सुरुवात झाली आहे. अभियांत्रिकी क्षेत्रात करिअर करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ही एक उत्तम संधी मानली जात आहे. कॉलेजमध्ये सध्या विविध आधुनिक व रोजगाराभिमुख अभ्यासक्रम उपलब्ध असून विद्यार्थ्यांना दर्जेदार तांत्रिक शिक्षण दिले जाते. उपलब्ध अभ्यासक्रमांमध्ये सिव्हिल इंजिनिअरिंग, कॉम्प्युटर इंजिनिअरिंग, मेकॅनिकल इंजिनिअरिंग, आर्टिफिशियल इंटेलिजन्स अँड मशीन लर्निंग तसेच इलेक्ट्रिकल अँड इलेक्ट्रॉनिक्स या शाखांचा समावेश आहे. दहावीनंतर तीन वर्षांचा डिप्लोमा अभ्यासक्रम पूर्ण करून विद्यार्थी थेट उद्योग क्षेत्रात



करिअर करू शकतात किंवा पुढील उच्च शिक्षणासाठीही संधी उपलब्ध आहे. विशेष म्हणजे, मुलींसाठी १०० टक्के शैक्षणिक शुल्क माफी देण्यात येत असून सर्व प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शासनाच्या नियमानुसार फी सवलतीचा लाभ मिळणार आहे. तसेच, विद्यार्थ्यांना अभ्यासानंतर १०० टक्के नोकरीची हमी देण्याचा दावा संस्थेकडून करण्यात आला आहे, त्यामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी ही मोठी संधी ठरत आहे. प्रवेशासाठी इच्छुक विद्यार्थ्यांनी त्वरित संपर्क साधावा, असे आवाहन संस्थेकडून करण्यात आले आहे.

# येत्या पावसाळ्यात ५१ हजार वृक्ष लागवड

- लोहा शहर हरित व स्वच्छ करण्यासाठी सर्वांच्या सहकार्याची गरज - आ प्रताप पाटील चिखलीकर
- एक कोटी १५ लक्ष रुपयांच्या विविध कामांचा शुभारंभ

लोहा : (स. गांवकरी)

लोहा शहर हरित व स्वच्छ झाले पाहिजे त्यातही सर्वपक्षीय नेत्यांची कार्यकर्त्यांची व शहरातील जनतेची साथ पाहिजे तेव्हा येत्या पावसाळ्यात शहरातील सर्वच भागात ५१ हजार वृक्ष लागवड करण्याचा व तो टिकविण्याची मोहीम राबविण्यात येणार आहे



यासाठी शाळा महाविद्यालये तसेच वृक्षप्रेमी यांचे सहकार्य लागणार आहे .लोहा शहर हरित शहर- स्वच्छ शहर व्हावे यासाठी सर्वांनी मिळून प्रयत्न करू असा विश्वास प्रतिमा तयार व्हावीत विधीमंडळ उपविधान समितीचे अध्यक्ष आ. प्रताप पाटील चिखडीकर यांनी व्यक्त केला

लोहा शहरात शनिवार (२५ ( एप्रिल) रोजी आमदार प्रताप पाटील चिखलीकर यांच्या हस्ते एक कोटी रुपयांच्या विकास कामाचा शुभारंभ झाला .ज्यात प्रभाग एक सायाळ रोड ते मारोती मंदिर सीसी रस्ता ३० लक्ष रुपये प्रभाग सहा शिक्षक कॉलनी २५ लक्ष रुपये सीसी रोड व नाली , १० लक्ष रुपये श्रीकृष्ण मंदिर सभागृह तर प्रभाग दहा जुन्या शहरात ५० लक्ष रुपयाचा सिमेंट रस्त्याचे भूमिपूजन पार पडले

नगराध्यक्ष शरद पवार, माजी नगराध्यक्ष किरण वट्टमवार उपनगराध्यक्ष करिम शेख, माजी नगराध्यक्ष केशव मुकदम मुकदम,मुख्याधिकारी श्रीकांत लाळगे माजी उपनगराध्यक्ष दता वाले ,माजी उपसभापती बालाजी पाटील , छत्रपती धुतमल उबाठा तालुका प्रमुख भीमराव पाटील शिंदे ,ऋषी पाटील ,गटनेते भास्कर पवार ,नगरसेवक हरिभाऊ चव्हाण, श्याम पाटील पवार, बालाजी खिल्लारे, नगरसेवक सदाशिव तेलंग , पार्वतीबाई जंगले, लक्ष्मी धुतमल पुजा खिल्लारे, सुशीलादेवी परिहार भागावाई पवार, माधुरी बोडके, सौ मांजलवाड , सुशीलाबाई कहाळेकर, अविनाश पवार, , गणेश बगाडे तुकाराम दाढेल सतीश निखाते, नामदेव पाटील पवार ,माजी नगरसेवक बालाजी भोसीकर गंगाधर महाबळे ,यासह यासह सर्व नगरसेवक आजी माजी पदाधिकारी उपस्थित होते नगराध्यक्ष शरद पवार व टीम यांना पद्भार स्विकारून १०० दिवस झाली. या काळात बॅनर मुक्त दुकाने, सात वर्षांच्या खंड नंतर मुख्य रस्त्यावर तिरंगा लाईड ,शहरात स्वच्छता, उन्हाळी पाणी टंचाई निवारण, प्रथदिवे वाचनालया साठी पुस्तके अशी उपक्रमे राबविली. युवा नेते प्रविण पाटील चिखलीकर यांच्या नेतृत्वात ही टीम शहराच्या विकासासाठी कार्यरत आहे

आ प्रताप पाटील म्हणाले की शहरात नगराध्यक्ष शरद पवार व त्याची टीम चागले काम करत आहे पण शहर हरित व स्वच्छ राहण्यासाठी सर्व पक्षीयाची तसेच नागरिकाची साथ पाहिजे येत्या पावसाळ्यात शहराच्या आजूबाजूला व शहरात जेथे शक्य आहे तेथे वृक्ष लागवड करावी शाळा महाविद्यालय यांचा सहभाग घ्यावा .वृक्षारोपण केल्या नंतर त्याचे संवर्धन झाले पाहिजे असे सांगून रस्ते दर्जेदार व्हावीत असा विश्वास त्यांनी व्यक्त केला .सायाळरोड , श्रीकृष्ण मंदिर, जुना लोहा येथे आ चिखलीकर व मान्यवरांच्या हस्ते नारळ फोडून कामाचा शुभारंभ झाला.